# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण १६, १९३७ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग** (१) ते (३)

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११८**

---

**राज्यातील अनुदानपात्र सर्व शाळांना अनुदान देण्याबाबत**

**(१) * ११४२९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानपात्र शाळांना अनुदान मिळावे इत्यादी महत्त्वाच्या मागण्यांसाठी एका संघटनेने आंदोलन केले होते, त्यावेळी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी पात्र ठरलेल्या सर्व शाळांना अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) राज्यातील अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००९ नुसार निधीच्या उपलब्धतेनुसार शाळांना वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. विहित निकषानुसार अनुदानास पात्र शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कांदिवली (मुंबई) येथील एका खाजगी इंटरनॅशनल शाळेत शिकणाऱ्या दोन मुलींचा शाळेतील कर्मचाऱ्यांने केलेला विनयभंग**

**(२) * ११४०१ श्री.जर्नादन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथील एका खाजगी इंटरनॅशनल शाळेत ज्युनिअर केजीमध्ये शिकणाऱ्या पाच वर्षाच्या दोन मुलींचा शाळेतील कर्मचाऱ्यांने विनयभंग केला असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्‌नुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी कांदिवली पोलीस स्टेशन येथे दिनांक ११/८/२०१५ रोजी FIR क्र.२७८/२०१५ दाखल करण्यात आला असून संशयीतास पोलीसांनी अटक केली होती न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर, पुणे, सोलापूर व अन्य जिल्हयांमध्ये ना-हरकत प्रमाणपत्र देऊन नवीन नियुक्तांना मान्यता प्रदान करण्यात आल्याबाबत**

**(३) * ११०७७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ मे २०१२ च्या शासन निर्णयानुसार नवीन नियुक्तीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्तीस मान्यता देण्यास बंदी टाकली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंदीचे उल्लघंन करुन नागपूर, पुणे, सोलापूर व अन्य जिल्ह्यात नवीन नियुक्तीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र तसेच नवीन नियुक्त्यांना मान्यता प्रदान करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंदीच्या कालावधीत मंत्रालयीन स्तरावरुन बनावट ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सर्व प्रकारामुळे शासनाच्या तिजोरीतून करोडो रुपयाचे अनुदानामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी करोडो रुपयांचा गैरव्यवहार करणा-या शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांना तात्काळ निलंबित करुन उच्चस्तरीय चौकशी करण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावर चौकशी सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) याबाबत आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## ग्रामीण, डोंगराळ आदिवासी वस्ती आणि पाड्यांवरील वस्तीशाळांवर काम करणाऱ्या शिक्षकांना निमशिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४) * १२७०२ श्री.महादेव जानकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण, डोंगराळ आदिवासी वस्ती आणि पाड्यांवरील वस्तीशाळांवर काम करणाऱ्या शिक्षकांना दिनांक १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शिक्षकांची सेवा विचारात घेऊन शासनाने त्यांना निमशिक्षक म्हणून सेवेत सामावून घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी वस्ती, पाड्यावरील वस्तीशाळा शिक्षकांना नियमित करुन देखील त्यांना असंख्य समस्यांना तोंड द्यावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शिक्षक सेवानिवृत्त होऊनही त्यांना सेवानिवृत्ती नंतरचे वेतन व जुन्या सेवानिवृत्ती योजनेचे लाभ मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, सदरहू वेतनाचा लाभ शिक्षकांना मिळणे केव्हापर्यंत अपेक्षित आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४), (५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दैठणा (जि.परभणी) येथील पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(५) * ११७०२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६७१४ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दैठणा (जि.परभणी) येथील पाणी पुरवठा योजनेत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण गुणवत्ता परिक्षण पथक, मुंबई यांच्या निष्कर्षानुसार एकूण किती रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे,
(२) असल्यास, गैरव्यवहार झालेल्या रकमेच्या वसुलीबाबत किती व कोणाविरुध्द कारवाई करण्यात आली,
(३) तसेच दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक ७ एप्रिल, २०१४ रोजी दिल्यानंतर जिल्हा परिषद, परभणी कडून कोणती कार्यवाही करण्यात आली या संबंधीचा अहवाल जिल्हा परिषद, परभणी यांचेकडून प्राप्त झाला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा. गुणवत्ता परिक्षण पथक, मुंबई यांच्या निष्कर्षानुसार रु.५०००/- पेक्षा जास्त रक्कम हातावर शिल्लक नसल्यामुळे लेखा विषयक बाबींचे उल्लंघन झाले नाही. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही.
(२) तथापि, योजनेचे पाईप बंदिस्त ठिकाणी न ठेवल्यामुळे २०० मी.पाईप ठिसूळ झाल्याचे निदर्शनास आल्याने रु. ८९,८००/- रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत असून संबंधितास तशी नोटीस पाठविली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | तांत्रिक सेवा पुरवठादार (७०%) | रु.६२,८६०/- |
| २) | अध्यक्ष, ग्रा.पा.पु. व स्व.स. (१५%) | रु.१३,४७०/- |
| ३) | सचिव, ग्रा.पा.पु. व स्व.स. (१५%) | रु.१३,४७०/- |
| | **एकूण रु.** | **८९,८००/-** |

(३) तांत्रिक सेवा पुरवठादार तसेच अध्यक्ष/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडून २०० मी.पाईप स्वखर्चाने बदलून घेऊन पाणी पुरवठा सुरळीत केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मरेगांव एम.आय.डी.सी. (ता.मुल, जि.चंद्रपूर) अंतर्गत ग्रेटा पॉवर प्लँट द्वारे टॉयर भुकटी वापरामुळे, तर पृथ्वी पॉवर प्लॅट मधून निघणाऱ्या राखेमुळे होत असलेले प्रदुषण**

**(६) * ११०९६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मरेगांव एम.आय.डी.सी. (ता.मुल, जि.चंद्रपूर) अंतर्गत ग्रेटा पॉवर प्लँट द्वारे टॉयर भुकटी वापरामुळे, तर पृथ्वी पॉवर प्लँट मधून निघणा-या राखेचे ढिगारे पाटात टाकत असल्यामुळे प्रदूषण निर्माण होवून नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे लोकप्रतिनिधी यांनी पाहणी केली असता दिनांक २७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीद्वारे होणा-या प्रदूषणामुळे परिसरातील शेतीचे नुकसान व नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने सदर कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.
(२) व (३) मे. पृथ्वी फेरो अलॉए व मे. एनर्जी लि. या दोन्ही उद्योगांना कारणे दाखवा नोटीस मंडळामार्फत बजाविण्यात आली असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईत रेशन दुकानातून अन्न सुरक्षा योजनेखाली देण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(७) * १२१६३ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रेशन दुकानातून अन्न सुरक्षा योजनेखाली देण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे मुंबईत अन्न सुरक्षा योजनेचे अन्नधान्य दर्जेदार असावे म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य प्राप्त होत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) त्याअनुषंगाने चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत भारतीय अन्न महामंडळास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षक-शिक्षकेतरांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत**

**(८) * १२६०९ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच अनुदानित संस्थामधील शिक्षक-शिक्षकेतरांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या देयकांना मंजूरी देण्यासाठी कार्यालय प्रमुखांच्यास्तरावर कमाल मर्यादा १ लाखावरुन २ लाख करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीच्या निर्णयानुसार १ लाखापर्यंतची देयके मंजूर करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आता २ लाखापर्यंतचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार शिक्षण विभागातील कोणत्या अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आले आहेत,
(५) शिक्षणाधिकारी यांचे अधिकार काढून घेण्यात आले आहे काय,
(६) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(७) २ लाखापर्यंतची वैद्यकीय देयके मंजूर करण्याचे अधिकार अन्य अधिकाऱ्यास देण्याऐवजी शिक्षणाधिकारी यांनाच प्रदान करण्यात यावे, याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनावर काय निर्णय घेण्यात आला आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.
(३) होय.
(४), (५) व (६) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २४.०८.२०१५ च्या शासन निर्णयास अनुसरून शालेय शिक्षण विभागाने दिनांक १८.०९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. २.०० लाख पर्यंतची सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करण्याचे अधिकार आता शिक्षण अधिकारी ऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात आले आहेत.
(७) बाब विचाराधीन आहे.

-----------------

**नागपूर येथील अजब बंगल्याजवळील शासकीय गोदामाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(९) * १२६३३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरातील शासकीय अन्न धान्य गोदामात एफ.सी.आय कडून पाठविण्यात आलेले गहू, तांदूळ, साखर व डाळ असे एकूण सुमारे ५ हजार टन अन्न धान्य गोदामात साठविले जाते, हे खरे आहे काय,
(२) नागपूर शहरात अजब बंगलाजवळील गोदामात सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत एफसीआय कडून पाठविण्यात आलेले गहू, तांदूळ, साखर, डाळ असे सुमारे दोन हजार मेट्रिक टन धान्य पावसामुळे सडल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे सडलेले व दुर्गंधी येत असलेल्या धान्याचा पुरवठा नागपूर शहरातील रेशन दुकानांमध्ये पुरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदरहू गोदाम ७० वर्षे जुने असून त्यांच्या दुरुस्तीसाठी व देखभालीसाठी एकही पैसा खर्च करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या इमारतीत विद्युत पुरवठा नसूनही हमाल कार्यरत असून हमाल २०-२० पोत्याची थप्पी लावत असून पोत्यांखाली हमालांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नागपूर स्थित महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे अजब बंगला परिसरातील गोदामात लाईट पाणी व मुत्रीघरची व्यवस्था नाही तसेच प्रत्येक जिल्हयात व्यवस्थापक, लिपीक २ ते ३ कर्मचारी काम करीत असून सध्या किती कर्मचाऱ्यांची नियमित नियुक्ती करण्यात आली आहे,

(७) असल्यास, सदरहू ५ गोदामांचे अद्ययावत बांधकाम करुन गोदामात काम करणाऱ्या कामगारांची मजुरी (वेतन) देणेबाबत तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नागपूर शहरातील ३ ठिकाणच्या शासकीय धान्य गोदामाची साठवणूक क्षमता १२१६९ मे. टन इतकी असून त्यापैकी १०७९४ मे. टन क्षमतेच्या गोदामात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याची साठवणूक करण्यात येते.

(२) नाही.

(३) नाही.

(४) नागपूर शहरातील म्युझियम येथील शासकीय धान्य गोदाम १९६३-६४ मध्ये बांधलेले असून, त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) नाही.

(६) म्युझियम, नागपूर येथील शासकीय गोदामाच्या कार्यालयात विद्युत व्यवस्था आहे. सदर गोदामाचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचेकडे असून या गोदामात महामंडळाकडील साठा अधीक्षक-१ व वर्ग-४ चे २ नियमित कर्मचाऱ्यासह कंत्राटी तत्वावर ३ असे एकूण ६ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर कार्यालयाचा एक अव्वल कारकून दर्जाचा नियमित कर्मचारी कार्यरत आहे.

गोदामातील प्रसाधनगृह जीर्ण झालेले असल्याने अन्नधान्य वितरण कार्यालयाच्या प्रसाधनगृहाचा वापर गोदामातील कामगार करतात.

(७) नागपूर शहर विभागात कार्यरत गोदाम कामगारांच्या सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

**माटुंगा, मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेतील काही तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या पदांच्या वेतनश्रेणीत अवास्तव वाढ केल्याबाबत**

**(१०) * ११७४० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सहाव्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी दिनांक १ जानेवारी, २००६ पासून लागू करण्याचा निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २००९ रोजी घेतला, त्यावेळी माटुंगा येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेतील काही तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये फेरफार करुन अवास्तव वाढ केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयसीटी कर्मचारी वेतन श्रेणीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालयाचे सह संचालकांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेवून चौकशीचे आदेश दिल्यानुसार आयसीटीचे संचालक यांच्या मान्यतेने ६ सदस्यांची चौकशी समिती नेमण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू संस्थेतील काही तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतन श्रेणी लागू करताना गैरव्यवहार झाला असतानाही या प्रकरणाला ५ वर्षे उलटल्यानंतरही उच्चस्तरीय समितीचा अहवाल अद्याप गुलदस्त्यातच असल्याची तक्रार मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) या संपूर्ण प्रकरणाची शासनस्तरावर चौकशी व्हावी व संबंधित दोषी कर्मचा-यांवर कारवाई व्हावी म्हणून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या उपसचिवांना दिनांक ६ मे, २०१० रोजी मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनेने पत्रही पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्यापी संबंधित दोषीविरोधात कारवाई न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विद्यापीठ शाखेने राज्यातील सर्व अकृषी विद्यापिठांकरिता सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी निर्गमित केलेल्या दिनांक ०७/१०/२००९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ व रसायन तंत्रज्ञान संस्थेतील काही पदांचा समावेश केलेला होता.

मात्र संचालकांच्या दिनांक २६/११/२००९ च्या प्रस्तावानुसार वेतनश्रेण्या सुधारित करुन तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यता प्राप्त अनुदानित संस्थांत कार्यरत शिक्षकेतर पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दिनांक ०७/०५/२०१० च्या शासन निर्णयान्वये लागु करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी दिनांक ७/१०/२००९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद झालेल्या वेतनश्रेण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी संचालनालयाकडुन करण्यात आलेली नाही. यामुळे काही पदांच्या वेतनश्रेणीत फेरफार व अवास्तव वाढीचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) तक्रार व पत्राचा अभिलेख आढळून येत नाही. याबाबत अभिलेखाची पुर्नपडताळणी करुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वाङ्‌मय प्रकाशित करण्याबाबत**

**(११) * १२२९३ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक ८२६१ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**

सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे वाङ्‌मय प्रकाशित करण्यासाठी शासनाने तीन स्वतंत्र्य समित्या नेमल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत या तिन्ही महापुरुषांचे केव्हा व किती वाङ्‌मय साहित्य प्रकाशित करण्यात आले आहे,

(३) असल्यास, हे साहित्य त्वरीत प्रकाशित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) या महापुरुषांचे वाङ्‌मय साहित्य १९७९ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबडकर यांचे लेखन आणि भाषणे या मालिकेतील एकूण २१ खंड व फोटोबायोग्राफीचा २२ वा खंड, २ सोर्स मटेरियल, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (इंग्रजी)

हे पुस्तक व पुनर्मुद्रीत साहित्य प्रकाशित करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांची एकूण १३ पुस्तके प्रकाशित करण्यात आली असून याव्यतिरिक्त ९ पुस्तके छपाईसाठी मूद्रणालयास दिली आहेत. राजर्षी शाहू महाराजांचा १ ग्रंथ ३ आवृत्त्यांमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील २४ वर्षे सेवा झालेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांना**
**विना अट निवडश्रेणी लागू करण्याबाबत**

**(१२) * १२४१७ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८८७ ला दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २४ वर्षे सेवा झालेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांना विना अट निवडश्रेणी लागू करण्याकरीता लोकप्रतिनिधी व शिक्षकांनी संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही शिक्षकांना विना अट निवडश्रेणी लागू करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांना विना अट निवडश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सध्या अटींच्या आधारावर निवडश्रेणी लागू करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ६७ अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना एआयसीटीईची मान्यता नसल्याबाबत**

**(१३) * ११९९७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अनंत गाडगीळ, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असल्याची परिस्थिती कायम असतानाच तब्बल ६७ अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना एआयसीटीईची मान्यताच नसल्याची महितीच्या अधिकारात उघड झाली असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शैक्षणिक संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) मान्यता नसलेल्या या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गात अडथळा निर्माण होणार नाही यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी शासनाने एआयसीटीईची मान्यता नसलेल्या अभियांत्रिकी संस्थांना मान्यता मिळणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर असलेल्या राज्यातील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता नसलेल्या अनधिकृत संस्थांची यादी माहिती अधिकारात संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(२) व (३) संबंधित संस्थांना त्रुटींबाबत नोटीसा बजावण्यात आल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये भवितव्ये घडविणा-या विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून मान्यताप्राप्त नसलेल्या संस्थांची यादी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळी नियमित प्रसिध्द करण्यात येते. त्याचप्रमाणे तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यताप्राप्त नसलेल्या अनधिकृत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत व अधिकृत संस्थांची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध असल्याचे शैक्षणिक वर्ष सुरू

होण्यापूर्वी दरवर्षी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात येते.
(४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित संस्थांनी विहीत कार्यपध्दतीनुसार परिषदेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील डाळीचे दर नियंत्रणात ठेवणे आणि साठेबाजी रोखण्याबाबत प्राईज मॉनेटरींग सेल स्थापन करण्याबाबत**

**(१४) * १११७२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ७६४० ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डाळीचे दर नियंत्रणात ठेवणे आणि साठेबाजी रोखण्यासाठी प्राईज मॉनेटरींग सेल स्थापन करण्याच्या सूचना केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागाने राज्य शासनाला माहे जून-जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागाच्या सूचना असतांनाही राज्यात प्राईज मॉनेटरींग सेल स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने उपाययोजना न केल्याने डाळींसह जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ होऊन जनतेला महागाईला तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, साठेबाजांवर कार्यवाही करणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून डाळ-तेल अधिक जीवनावश्यक वस्तुंचे माफक दरात वितरण करणे, प्राईज मॉनेटरींग सेल स्थापन करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) राज्यात प्राईज मॉनेटरींग सेलची स्थापना करण्यात आली असून २२ जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती सन २०११ पासून दररोज केंद्र शासनास पाठविण्यात येतात.

(३) व (४) तूरडाळींची झालेली प्रचंड भाववाढ विचारात घेऊन, केंद्र शासनाची दिनांक २८.०९.२०१५ व दिनांक १८.१०.२०१५ ची अधिसूचना विचारात घेऊन शासनाच्या दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यावर साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे. त्यानुसार साठेबाजांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सवलतीच्या दरात तुरडाळ वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अन्नसुरक्षा योजनेतून रेशनवर स्वस्त दरात**
**अन्न धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) * ११२४१ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्नसुरक्षा योजने अंतर्गत प्रति व्यक्ती महिन्याला तीन किलो गहू व दोन किलो तांदूळ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) तसेच दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना अन्न सुरक्षा योजनेतून स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धान्य अतिअल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्नसुरक्षा योजनेमार्फत देण्यात येणाऱ्या कोट्यात वाढ करणेबाबत तसेच दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्न धान्य (गहू व तांदूळ) देण्यात येते, तर अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिशिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो अन्नधान्य देण्यात येते.

(२), (३), (४) व (५) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळत असलेल्या परंतु राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या औरंगाबाद विभागातील सर्व, अमरावती विभागातील सर्व व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय दि.२४ जुलै, २०१५ रोजी घेण्यात आला असून त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या दराने दि.१५ ऑगस्ट, २०१५ पासून त्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील शेतक-यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतून कमी दरात मिळणाऱ्या धान्यापासून डावलले जात असल्याबाबत

**(१६) * ११३६४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ६ लाख ३१ हजार ६४४ शेतक-यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतून देण्यात येणा-या कमी दरात मिळणाऱ्या धान्यापासून डावलले जात असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील अनुकंपा तत्वावरील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) * १२३२७ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००२ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा तत्त्वावर भरती करण्याचे स्पष्ट आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक संस्थामध्ये सेवेत असताना आकस्मित मृत्यू झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील वारसाला शासकीय सेवेत किंवा ज्या संस्थेत काम करतो किंवा जिल्हयातील अन्य संस्थेत रिक्त पदावर त्याचे समायोजन करण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्हयात गेली ५ वर्षे २५० ते ३०० अनुकंपाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर जिल्हयातील अनेक शैक्षणिक संस्था चालकांनी रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवूनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनुकंपा तत्वावरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अनुकंपा तत्वावरील पदे भरती करण्याबाबतचे स्पष्ट आदेश दि. ३१ डिसेंबर, २००२ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सोलापूर जिल्हयातील शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतचे शिक्षकांचे ६ व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १० असे एकूण १६ प्रस्ताव प्रलंबित होते, हे खरे आहे.

(४) व (५) दि. ३१.१२.२००२ च्या शासन निर्णयानुसार सदर १६ प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून दि. ३०.११.२०१५ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे पाठविण्यात आले आहेत.

(६) राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी/अंशत: अनुदानित माध्य. व उच्च माध्यमिक व सैनिकी शाळांसाठी सुधारीत आकृतीबंध बाबत आयुक्त (शिक्षण) यांच्या

अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून पदांच्या आकृतीबंधा संदर्भात धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर अनुकंपा नियुक्तीबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात येतील.

-----------------

**राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(१८) * ११६७१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यात गेल्या दोन वर्षात एकाही नवीन महाविद्यालयाला मंजूरी दिली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बारावीच्या निकालाची टक्केवारी काही वर्षापासून वाढली असून महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी अडचणी येत असल्यामुळे यंदा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांना २० टक्के जागा वाढवून द्याव्या लागल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची शैक्षणिक वाढ खुंटल्याने शासनाने राज्यात नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये ०२ महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे. राज्यातील विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहणार नाहीत यासाठी विद्यापीठांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना शासनाच्या दि. १३/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशीनुसार नवीन बृहत आराखडे तयार करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) उच्च शिक्षणाचे समतोल व समन्यायी वाटप होण्याच्या दृष्टीने विद्यापीठानी सर्व समावेशक बृहत आराखडा तयार करुन राज्य उच्च शिक्षण परीषदेसमोर सादर करण्याच्या सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना शासन परीपत्रक दि. २९/०४/२०१५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील राष्ट्र पुरुषांप्रमाणेच पंतप्रधान नरेंद्र मोदी याची छायाचित्रे तसेच अन्य पुस्तके यांच्या खरेदीसाठी लागणा-या निधीबाबत

**(१९) * ११४६८ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज या राष्ट्र पुरुषांप्रमाणेच पंतप्रधान नरेंद्र मोदी याची छायाचित्रे तसेच अन्य पुस्तके यांच्या खरेदीसाठी सुमारे १०० कोटी रुपये खर्च करण्याकरीता शालेय शिक्षण विभागाने दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी आदेश काढला व त्याच दिवशी ही रक्कम खर्च करण्याची अट घातली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी ही सर्वशिक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रमासाठी असून त्यासाठी केंद्र शासनाकडून ६५ टक्के निधी तर राज्याचा वाटा ३५ टक्के असतो व त्यानुसार सदर खरेदीत राज्याचा ३५ टक्के निधी लागणार असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर होताच त्यात अनियमितता असल्याचे निदर्शनास आल्यामुळे या खरेदीस वित्त विभागाने आक्षेप घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त विभागाकडे खरेदीचा प्रस्ताव केव्हा सादर करण्यात आला होता, वित्त विभागास कोणत्या अनियमितता आढळून आल्या होत्या व त्याची पूर्तता केव्हा करण्यात आली व तद्नंतर वित्त विभागाने प्रस्तावास मान्यता दिली असल्यास मान्यता केव्हा देण्यात आली,

(४) राज्यातील शासकीय मुद्रणालयात राष्ट्रपुरुषांची छायाचित्रे सुमारे ११ रुपयांना उपलब्ध असताना प्रति नग परराज्यातून रुपये १३९५ किंमतीने छायाचित्रे खरेदी करण्यात आली, तसेच खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांची किंमत राज्यात कमी असताना परराज्यातून खरेदी करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले व खरेदीतील किंमतीच्या तफावतीला जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) हे खरे नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाकगृहासाठी असलेली रिक्त पदे

**(२०) * १११९० श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या पाकगृहात एकूण ५२ कर्मचा-यांची पदे मंजूर असताना तब्बल ३२ पदे रिक्त असल्याने रुग्णांना पुरेसा आहार दिला जात नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे पाकगृहात एकुण ६८ पदे मंजूर असून २६ पदे भरलेली आहेत व ४२ पदे रिक्त पदे आहेत. सदर रिक्त पदांवर परिचारिका वसतीगृहातील ११ स्वयंपाकी कर्मचारी व वर्ग-४ मधील इतर कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले असून प्रतिदिन ८०० ते १००० आंतररुग्णांना पुरेसा आहार दिला जातो. तसेच अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील १०० आंतररुग्णांनाही पुरेसा आहार पुरविण्यात येतो.

(२) पाकगृहातील प्रमुख स्वयंपाकी, स्वयंपाकी, सहायक स्वयंपाकी इत्यादी वर्ग-४ संवर्गातील पदे मंजूर असून रिक्त पदे भरण्यावर शासन निर्बंध असल्याने सद्यस्थितीत रिक्त पदे भरता येत नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत अन्य विभागातून वर्ग-४ कर्मचारी पाकगृहात उपलब्ध करुन देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केसरी शिधापत्रिकाधारक लाभार्थीना स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) * ११५७८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे श्री.राजेंद्र मुळक, श्री.मितेश भांगडिया, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केसरी शिधापत्रिकाधारक लाभार्थीना स्वस्त दरात गहू, तांदूळ व जीवनावश्यक वस्तूचे वितरण पुन्हा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे १ कोटी ७७ लाख केसरी शिधापत्रिकाधारकांना (ए.पी.एल) चे धान्य गेल्या आठ महिन्यांपासून स्वस्त धान्य दुकानातून बंद करण्यात आल्याचे दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, केसरी शिधापत्रिकाधारकांची नोंद अन्नधान्य विभागात प्राधान्याने झालेली असल्यास त्यांनाच स्वस्त दरात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या केसरी शिधापत्रिकाधारकांची प्राधान्यात नोंद झालेली नाही त्यांना जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात त्वरित उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) मधील १.७७ कोटी लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात ऑक्टोबर, २०१४ पर्यंत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले होते. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांपैकी शहरी भागातील रु. ५९,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या व ग्रामीण भागातील रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या केशरी शिधापत्रिकाधारकांचा समावेश प्राधान्य कुटूंब लाभार्थ्यांमध्ये करण्यात आला आहे.

(३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या उपरोक्त १.७७ कोटी लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**कोकणातील रत्नागिरी येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(२२) * ११८९८ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ९८३९ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाअंतर्गत सध्या ८०० पेक्षा अधिक महाविद्यालये येत असल्याने मुंबई विद्यापीठाचे विकेंद्रीकरण करुन, कोंकणवासिय विद्यार्थ्यासाठी रत्नागिरी येथे स्वतंत्र कोंकण विद्यापीठ निर्माण करण्यात यावे, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत कोंकण परिसरातील विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक व शिक्षण तज्ञ यांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विद्यापीठांचे विभाजन करण्यासंदर्भात डॉ. राम ताकवले यांचे अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या समितीचा शासनास प्राप्त झालेल्या अहवालाबाबत शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्यानुसार कोणता निर्णय घेतला आहे तसेच निर्णय झाला नसल्यास, त्याबाबत सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**आदिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) गावात विहिरीचे दूषित पाणी प्यायल्याने २५ ग्रामस्थांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याबाबत**

**(२३) *१२२३९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) गावात विहिरीचे दूषित पाणी प्यायल्याने २५ ग्रामस्थांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे माहे जुलै, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पावसाळया आधी गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे निर्जुतुंकीकरण करण्याची जबाबदारी पार न पाडणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) व (३) होय, उदभव परिसर स्वच्छ नसल्याने आरोग्य विभागाने पिवळे कार्ड अगोदरच दिलेले होते. तथापि, ग्रामपंचायतीने उदभव परिसर व पाणी स्वच्छता करण्यात दुर्लक्ष केल्याने ही साथ रोग झाल्याचे निदर्शनास आले आहे. तद्नंतर गटविकास अधिकारी यांनी पाहणी करुन ग्रामपंचायतीला नोटीस दिली व भविष्यात पुन्हा साथ रोग उदभवू नये याकरिता उपाययोजना सुचविल्या, त्यानुसार ग्रामपंचायतीने परिसर स्वच्छता व उदभवाची दुरुस्ती करुन नियमित पाणी शुध्दीकरण सुरु करुन ग्रामस्थांना पाणी पुरवठा सुरु केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वीच्या वर्गामध्ये ४० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा बंद करण्याबाबत**

**(२४) * ११८१० श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ७५०६ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालात माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वीच्या वर्गामध्ये ४० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल तर ती माध्यमिक शाळा बंद करावी अशी शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या इयत्ता ९ वीच्या वर्गाची राज्यात एकुण संख्या किती आहे,
(३) असल्यास, ४० पेक्षा कमी संख्या असलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांची अन्यत्र दुसऱ्या शाळेत सोय करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) प्रश्न भाग (१) बाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील बहुतांशी विद्यार्थी डी.एड. पदवी घेण्यासाठी इच्छूक नसल्याबाबत**

**(२५) * ११५४५ श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांशी विद्यार्थी डी.एड. पदवी घेण्यासाठी इच्छूक नसल्याने डी.एड.महाविद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच अनुदानित कॉलेजमधील प्राध्यापकांनासुध्दा आर्थिक टंचाईचा सामना करावा लागत असून कर्मचा-यांनाही शासनाच्या कोणत्याही सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या सोयीसुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या प्रत्येक जिल्हयात वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२६) * ११९५१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवस्थानांच्या मदतीने राज्याच्या प्रत्येक जिल्हयात वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय नुकताच माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयावर अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) व ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांची संख्या वाढत असल्याबाबत

**(२७) * १२०५५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) व ग्रामीण भागात (विरार व नालासोपारा पूर्व भाग, वसई पूर्व भाग) मोठया प्रमाणावर बोगस डॉक्टरांची संख्या वाढलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी आणि त्यांच्या घरात, आरोग्य केंद्रावर छापे टाकून बोगस डॉक्टरांना पकडले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहचू नये म्हणून बोगस डॉक्टरांबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. परंतु, पालघर जिल्ह्यातील बोईसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रफीक नासीर शेख हा व्यक्ती अवैध वैद्यक व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्या विरुध्द बोईसर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) हे प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील खारपाण पटटयातील गांवे १४० गांव योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत

**(२८) * १२५७३ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ८१३६ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि. बुलढाणा) येथील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गांवे योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर २०१४ रोजी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारपाण पट्टयातील गांवे वरील योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) खारपाण पट्टयातील १४० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दि.२/१२/२०१३ रोजी शासनाने प्रशासकीय मान्यता दिली असून, निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे. योजनेच्या प्रत्यक्ष कामास दि. २०/५/२०१४ रोजी सुरुवात होऊन, योजनेची ५५ टक्के भौतिक कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे सदर योजनेत नवीन गावे समाविष्ट करणे तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या योग्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तंत्र शिक्षण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीद्वारे ऑनलाईन करण्याबाबत**

**(२९) * १२५२१ श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अकृषी विद्यापिठे, अनुदानित अभिमत विद्यापिठे, सर्व महाविद्यालये आणि अनुदानित संस्था तसेच तंत्र शिक्षण खात्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीद्वारे ऑनलाईन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ च्या चौथ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) या विभागाच्या नियंत्रणाखालील शासन अनुदानित अकृषी विद्यापीठे, शासन अनुदानित अभिमत विद्यापीठे, सर्व अनुदानित महाविद्यालये, इतर अनुदानित संस्था अणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामधील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्यांची देयके एचटी-सेवार्थ या संगणकीय प्रणालीद्वारे अदा करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१/०८/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर कर्मचाऱ्यांचे वेतन एचटीई-सेवार्थ प्रणालीद्वारे अदा करण्याच्या अनुषंगाने सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक माहितीची तपासणी करुन ती सदर प्रणालीमध्ये भरण्याचे काम सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कनिष्ठ महाविद्यालयाच्या संच मान्यतेबाबत

**(३०) * १२३८४ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७५९७ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनिष्ठ महाविद्यालयाच्या संच मान्यतेबाबतच्या सॉफ्टवेअरमधील त्रुटी दूर करण्याचे आश्वासन मा.शिक्षणमंत्री यांनी देऊनही सॉफ्टवेअर दुरुस्त करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,संच मान्यतेतील निकष बदलल्यामुळे महाविद्यालयांशी आणि शाळांशी निगडीत कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक संख्येवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामान्य जनतेस स्वस्त धान्य दुकानातून डाळ व खाद्यतेल उपलब्ध करुन देणेबाबत

**(३१) * ११७६४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळाची तीव्रता तसेच शेतकऱ्यांकडे धान्य, डाळ व खाद्य तेल उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यासह सर्व सामान्यांना दैनंदिन अडचणीला सामोरे जावे लागत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोद्यांकडे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाई, दुष्काळ, अन्न टंचाई व भुकबळी लक्षात घेता गोरगरीब, मध्यमवर्गीय व शेतकरी यांना स्वस्त धान्य दुकानातून डाळ व खाद्यतेल इ.जनतेला उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

अशा मागणीचे निवेदन माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये देण्यात आले आहे.

(२) व (३) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळत असलेल्या परंतू राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या औरंगाबाद विभागातील सर्व, अमरावती विभागातील सर्व व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय दि. २४ जुलै, २०१५ रोजी घेण्यात आला असून त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या दराने दि. १५ ऑगस्ट, २०१५ पासून त्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

-----------------

## विश्रांतवाडी व कोथरुड (जि.पुणे) येथील गॅस सिलेंडरचे अनुदान तसेच कोथरुड येथील एकाच कुटुंबाला पाच महिन्यांत तीस गॅस सिलेंडरचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(३२) * ११२०७ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विश्रांतवाडी (ता.जि.पुणे) येथील येथील दिपक रामचंद्र त्रिभुवन यांच्या पत्नीच्या नावांवर दर महिन्याला एच.पी.चा गॅस सिलेंडर घेत नसतांना व संबंधित बँकेत खाते व आधार लिंक केले नसतांनाही गॅस सिलेंडरचे अनुदान जमा होत असल्याचे, तसेच कोथरुड (जि.पुणे) येथील एकाच कुटुंबाला पाच महिन्यांत तब्बल तीस गॅस सिलेंडरचे वाटप करण्याचा व दर महिन्याला गॅस सिलेंडर घेतला नसतांना परस्पर गॅस बुकिंग करुन तो दुसऱ्याला विक्री करण्याचे प्रकार घडत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्याकडे श्री.दिपक रामचंद्र त्रिभुवन यांनी २१/०८/२०१५ रोजी तक्रार अर्ज सादर केलेला होता हे खरे आहे.

तसेच कोथरुड (जि.पुणे) येथील एकाच कुटुंबाला पाच महिन्यांत तब्बल तीस गॅस सिलेंडरे वाटप झालयाचे प्राप्त तक्रारीबाबत चौकशी केली असता तपासणीमध्ये सत्यता आढळून आली नसल्याने, हे खरे नाही.

(२) होय.

(३) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी कोणीही दोषी असल्याचे आढळून न आल्याने कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही.

कोथरुड (जि.पुणे) येथील तक्रारीबाबत सत्यता आढळून न आल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धान्याचा लिलाव दोन वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) * ११२६८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या तब्बल २५ हजार क्विंटल धान्याचा लिलाव दोन वर्षे प्रलंबित असल्यामुळे एकुण १६ गोदांमात नवे धान्य ठेवण्यासाठी जागाच शिल्लक नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीच्या प्रत्येक हंगामात माहे ऑक्टोबरपासून ते मार्च-एप्रिलपर्यंत धान खरेदी करुन मार्केटिंग फेडरेशनमार्फत दरवर्षी लिलाव केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रक्रियेला खंड पडल्याने सन २०१३-१४ ला खरेदी केलेल्या म्हणजेच मागील वर्षी खरेदी केलेल्या धान्याचे लिलाव तब्बल एक वर्षानंतर म्हणजेच जुलै महिन्यात घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लिलाव होईपर्यंत मागील वर्षाचे धान्य गोदामात शिल्लक राहिल्याने सन २०१४-१५ या सरत्या हंगामातील धान्याची खरेदी मार्केटींग फेडरेशनने केली नसल्याने शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल धान्य शिल्लक राहिल्यामुळे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांचे धान्य शिल्लक राहुन आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी केलेल्या धानाची ई-निविदा पध्दतीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विक्री सुरु असल्याने खरीप पणन हंगाम २०१४-१५ मध्ये खरेदी होणाऱ्या धानाच्या साठवणूकीकरीता गोदामे उपलब्ध न झाल्याने धानाची खरेदी झालेली नाही.
(५) जिल्हाधिकारी स्तरावरुन धानाची विक्री करण्याची कार्यवाही सुरु असून जसजशी गोदामे रिक्त होतील त्यानुसार खरीप पणन हंगाम २०१५-१६ मधील धान खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील भिडेवाडयाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणेबाबत**

**(३४) * ११८४० श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ७४९९ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील पहिली मुलींची शाळा पुणे येथील ज्या भिडेवाडयात फुले दाम्पत्यांनी सुरु केली त्या वास्तुला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची मागणी वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेने याबाबत ठराव करुन भिडेवाडा बाबत भुसंपादन प्रक्रिया करण्यासाठी रु. १.३० कोटी इतका निधी शासनाकडे जमा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिडेवाडयातील भुसंपादनबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका निकाली काढण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत काय,
(४) उक्त विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून शासनाने भिडेवाडयाची जागा ताब्यात घेवून तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथालय सुरु करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे,

भिडेवाडा राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यायोग्य नसल्याचे अभिप्राय भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय, मुंबई यांनी दिले आहे. तथापि, सदर वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याच्या ठराव पुणे महानगरपालिकेने संमत केला आहे.

(२) होय,

(३) व (४) मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याबाबत याचिका प्रलंबित असून संबंधीत भूसंपादन अधिकारी व पुणे महानगरपालिका यांचेकडून संबंधीत अधिकारी सरकारी वकीलामार्फत न्यायालयात पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी वर्ग व तुकडयांच्या निकषांबाबत**

**(३५) * १२४५१ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी वर्ग व तुकडयांच्या निकषांबाबत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये नवीन शासन निर्णय निर्गमित केल्याने राज्यातील मुख्याध्यापक व शिक्षक मोठया संख्येने अतिरिक्त होण्याचे तसेच मोठया संख्येने शाळा व वर्ग तुकडया बंद होणार असल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात भिती निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. तथापि सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्‌यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्‌यालयातील विद्‌यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३६) * ११३६० श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्‌यापिठ कार्यक्षेत्रातील महाविद्‌यालयात व विद्‌यापीठ स्तरावरील विद्‌यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन एका विद्‌यार्थी संघटनेने मा. कुलगुरु यांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) सप्टेंबर, २०१५ मध्ये विविध संघटनांनी प्रस्तुत विद्‌यापीठाकडे आपल्या विविध मागण्यासंदर्भात प्रस्तुत विद्‌यापीठाकडे विविध निवेदने दिलेली असून, यासंदर्भात विद्‌यापीठाशी ज्या-ज्या बाबी निगडित आहेत अशा मागण्यासंदर्भात विद्‌यार्थी संघटनेच्या मागण्यांची पूर्तता केलेली आहे.

-----------------

**मुंबई विद्‌यापीठातील बीएससी आयटीच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट विषयामध्ये मॉडरेटरने अनेक विद्‌यार्थांना शुन्य गुण दिल्याबाबत**

**(३७) * १२१७८ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्‌यापीठातील बीएससी आयटीच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयामध्ये मॉडरेटरने अनेक विद्‌यार्थांना शुन्य गुण दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पदवी प्रमाणपत्राचा दंड माफ केल्याने आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(३८) * ११५४७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयामुळे आणि भूमिकेमुळे विद्यापीठाचे मागील साडेचार वर्षात सातत्याने आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी परिस्थितीच्या नावाखाली पदवी प्रमाणपत्राचा दंड माफ करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतल्यामुळे विद्यापीठाचे सुमारे ३५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय. तथापि विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यात मागील बऱ्याच कालावधीपासून सततची दुष्काळी परिस्थिती गारपीट इत्यादीमुळे या भागातील विद्यार्थ्यांत त्यांचे पदवी प्रमाणपत्र घेता येत नव्हते. त्यामुळे रु. ५०/- प्रतिवर्ष आकारण्यात येणारा दंड माफ करण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेण्यात आला. तरी पदवी प्रमाणपत्राचा दंड माफ केल्याने विद्यापीठाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे म्हणणे योग्य ठरणार नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया येथे होणा-या क्रीडा संकुलाबाबत

**(३९) * १२५४३ श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथे निर्मित होत असलेल्या क्रीडा संकुलाचे काम केव्हापर्यंत सुरु होणार आहे,

(२) तसेच, या संकुलास क्षत्रिय महाराज राजाभोज क्रीडा संकुल असे नाव देणार आहे काय,

(३) अद्याप क्रिडा संकुलाचे काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) जिल्हा क्रीडा संकुल, गोंदियाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया यांच्यामार्फत सुरु असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(२) याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागातील पाच जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांची रिक्त पदे असल्याबाबत**

**(४०) * १२०७९ श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील पाच जिल्ह्यातील २८ अभियांत्रिकी महाविद्यालयात १८५४ प्राध्यापकांची पदे मंजूर असताना सुमारे १२०० प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार औरंगाबाद विभागातील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अमरावती विभागातील संबंधित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांची अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (AICTE) च्या मानकांनुसार तपासणी करण्यात आली होती. तपासणी दरम्यान ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयात काही त्रुटी आढळल्या आहेत, त्यांना विभागीय कार्यालयामार्फत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यांना त्रुटींच्या पुर्ततेसाठी ०३ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर सदर संस्थाची पुन्हा तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील शिवडी येथे समुद्रकिना-यासमोरच विषारी कोळसा साठवण्यात आल्याबाबत

**(४१) * ११६४० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील शिवडी येथे समुद्रकिना-यासमोरच उघड्यावर १.५ लाख मेट्रिक टन विषारी कोळसा साठवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईकरांचे आरोग्य, पर्यावरण व मत्स्य व्यवसायाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांनी याबाबत महाराष्ट्र प्रदूषण व नियंत्रण मंडळाकडे तक्रार करुनही मंडळाने दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली तसेच प्रदुषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२), व (३) हे खरे नाही.

(४) हाजी बंदर येथील कोळसा छोटया बार्जसमधून क्रेन मशिनरीच्या सहाय्याने उतरविला जातो. तेथून तो ट्रकद्वारेसाठवणूकीच्या जागी ताडपत्री आच्छादीत करून नेला जातो, तसेच वाहतुकीच्या मार्गामध्ये ट्रॅफीक पोलिसाच्या मदतीने कोळसा वाहतुक करणाऱ्या वाहनांचा मार्गामध्ये बदल करण्यात आलेला आहे व सदरील मार्गावर कोळसा वाहतुकदाराकडून पाणी फवारले जाते व कोळसा साठवण्याच्या जागेभोवती पत्र्याचे कुंपण (१०-१२ फुट उंचीचे) उभे केलेले आहेत. तसेच सदर कोळशामुळे धुळीचे प्रदुषण रोखण्यासाठी कोळशावर पाण्याची फवारणी केली जाते. तसेच कोळशाची वाहतुक करणाऱ्या वाहनांधारकांना तो बंदिस्त वाहनातुन करण्याबाबतच्या सुचना दि.२३.१२.२०११ रोजी देण्यात आल्या असून मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना दि.२४.०८.२०१२ रोजी हवा प्रदूषण नियमांतर्गत प्रस्तावित आदेश देण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर परिसरातील हवेची गुणवत्ता वेळोवळी तपासण्यात येते व धुळीचे प्रमाण जास्त आढळून आल्यास मुंबई पोर्ट ट्रस्टला योग्य ती काळजी घेण्याबाबतच्या सुचना दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कला व क्रीडा शिक्षकांच्या पद भरतीबाबत**

**(४२) * ११००९ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कला व क्रीडा शिक्षकांच्या पदभरतीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश कला व क्रीडा शिक्षकांना कोणतेही सबळ कारण न देता सन २०१२-२०१३ मध्ये शासनाव्दारे नोकरी वरुन काढुन टाकण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोकरी वरुन काढून टाकण्यात आलेल्या या कला व क्रीडा शिक्षकांची पदभरती करण्यात येणार आहे काय, सदरहु पदभरती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयांकरिता अंशकालिन निदेशकांची भरती करण्याकरीता दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. मात्र सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्याने शासन स्तरावर फेरआढावा घेऊन कला, क्रीडा व कार्यानुभव विषय शिकविण्याकरीता अतिथी निदेशकांचे पॅनल तयार करण्याकरीता दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे आदेश निर्गमित करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**जळगांव जिल्हयातील माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची बेकायदा भरती केल्याबाबत**

**(४३) * ११८६९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील काही माध्यमिक शाळांमध्ये संच मान्यता व वैयक्तिक पद मान्यता नसतांनाही बेकायदेशीर भरती करण्यात येऊन सदर पदांना मान्यता दिल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई व उपनगरात विशिष्ट डॉक्टरांकडून गर्भपातांच्या औषधांचा होत असलेला काळाबाजार**

**(४४) * १२०१५ श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात काही विशिष्ट डॉक्टरांकडून ऑनलाईनद्वारे राजस्थान, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यातून छुप्या मार्गाने गर्भपाताची औषधे मागवून त्याची काळयाबाजाराने विक्री होत असल्याची घटना डोंबिवलीतील एका औषधविक्री क्षेत्रातील व्यक्तीने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अशा घटनांमध्ये किती दोषी डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

माहे ऑगस्ट, २०१५ वा त्यादरम्यान डोंबिवलीमध्ये अशा प्रकारची कोणतीही घटना अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली नाही. तसेच अशा प्रकारची तक्रारही प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनांचे अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्याबाबत**

**(४५) * ११६१२ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनांचे अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्याचा विचार शासनस्तरावर सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विचाराधीन असलेल्या उक्त प्रश्नाबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनांचे अभियांत्रिकी महाविदयालयांमध्ये रुपांतर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये नविन शिधापत्रिका काढण्यासाठी किंवा त्यातील काही दुरुस्त्या करुन मिळण्याबाबतचा घेतलेला निर्णय

**(४६) * ११३१७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये नविन शिधापत्रिका काढण्यासाठी किंवा त्यातील काही दुरुस्त्या करुन मिळण्याबाबत शिधापत्रिकाधारकाने अर्ज केल्यानंतर एका महिन्याच्या आत नविन शिधापत्रिका देण्याबाबतचा निर्णय घेणे संबंधित कार्यालयांना शासनाने बंधनकारक केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन शिधापत्रिका देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :**

(१) व (२) होय, नविन शिधापत्रिका देताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत शासन परिपत्रक क्रमांक शिवाप-२०१३/प्र.क्र.१०५/नापु-२८, दि. २९ जून, २०१३ अन्वये सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांना मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हा परिषदेच्या बहुतांश प्राथमिक शाळांची झालेली दुरवस्था

**(४७) * १३२६७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा, जिल्हा परिषदेच्या बहुतांश प्राथमिक शाळांची दुरवस्था झाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून त्यामुळे शिक्षण व क्रिडा समितीच्या सभेत जिल्ह्यातील ७७ प्राथमिक शाळांची दुरूस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी १ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांच्या दुरूस्तीसाठी निविदा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

जिल्हा नियोजन समिती, सातारा यांनी मंजूर केलेल्या रु. २०० लक्षच्या नियतव्ययामधून सन २०१५-१६ मधील शाळा दुरुस्तीच्या रु. १८६.५० लक्षच्या कामांना सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण व क्रीडा समितीने मान्यता दिली आहे.

(३) याबाबत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये अनधिकृतरित्या सुरु असलेल्या मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असल्याबाबत

**(४८) * १३३९० श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये अनधिकृतरित्या सुरु असलेल्या मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये साधारणत: ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे अलिकडेच केलेल्या पाहणीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित अनधिकृत शाळांवर कार्यवाही करण्याबाबत तसेच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर शाळांपैकी काही शाळांना महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम, २०१२ अंतर्गत मान्यता मिळालेली असून उर्वरित अनधिकृत शाळांवर कारवाई सुरु आहे. त्यानुषंगाने अशा शाळा बंद करण्याबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी अशा अनधिकृत शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. त्यानुसार शाळा बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे नजिकच्या मान्यता प्राप्त शाळेत समायोजन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारात वाढ करण्याबाबत

**(४९) * १३६८६ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारात सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये केवळ ५ टक्के वाढ करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाढ ही अतिअल्प असून सध्याची महागाई विचारात घेऊन शालेय पोषण आहाराच्या निधीत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित / अंशत: अनुदानित शाळा बाल कामगार प्रकल्प इ. मधील इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येते.

केंद्र शासन दरवर्षी अन्न शिजविण्याच्या दरात वाढ करते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १२/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याच्या दरात ५ % वाढ करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून कोणताही परवाना न घेता विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांची शुल्क घेवून क्लासेस चालत असल्याबाबत**

**(५०) * १४०२९ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ९८५९ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून कोणताही परवाना न घेता विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांचे शुल्क घेवून क्लासेस चालवतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोचिंग क्लासेस मध्ये शिकवणारे प्राध्यापक हे एक तर तज्ञ नसतात किंवा शाळा, महाविद्यालयात नोकरी करत असून देखील तेथे न शिकवता कोचिंग क्लासेस मध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांना भाग पडतात, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत हजारो रुपयांची शुल्क विद्यार्थ्यांकडून अनधिकृत घेवून सुध्दा कोणताही टॅक्स भरत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनधिकृतरित्या चालविणा-या खाजगी कोचिंग क्लासेसवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२), (३) व (४) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम २३ (क) नुसार कोणत्याही शिक्षक कर्मचाऱ्यास खाजगी शिकवणी घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

तसेच, खाजगी शिकवणीवर कशाप्रकारे नियंत्रण ठेवता येईल याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्रायासाठी प्रस्ताव सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माटुंगा (मुंबई) येथील वीर जिजामाता तंत्रशिक्षण संस्था या नामांकित अभियांत्रिकी शिक्षण संस्थेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५१) * १४०४५ श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथील वीर जिजामाता तंत्रशिक्षण संस्था या नामांकित अभियांत्रिकी शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थीनींकरिता गेल्या १० वर्षापासून सुरु असलेल्या वसतीगृहाच्या बांधकामात एक ते दीड कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार या शिक्षण संस्थेतील माजी प्राध्यापक श्री. के.डी.गावंड यांनी दि. ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाने संस्थेला सन २००६ मध्ये रुपये २ कोटी ३६ लाख तसेच एआयसीटीई या संस्थेकडून १ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान या शिक्षण संस्थेला मिळाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००६ मध्ये बांधकामास प्रत्यक्ष परवानगी मिळूनही वसतीगृहाचे बांधकाम २०११ मध्ये सुरु झाले, तसेच बांधकामावर किती खर्च करण्यात आला यासंबंधीचे स्पष्टीकरण वा ऑडीट रिपोर्ट शासनाकडून तपासण्यात आला आहे काय,

(४) तक्रारदाराने तक्रारीत उल्लेख केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपास करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वसतिगृहाच्या बांधकामास शासनाकडून फेब्रुवारी २००६ मध्ये निधी मिळाला असला तरी मुंबई महापालिकेकडून बांधकाम सुरु करण्यास (Commencement Certificate up to plinth) परवानगी दि. ४.९.२०१० ला मिळाली. त्यानंतर कंत्राटदाराची नियुक्ती दिनांक १०.१२.२०१० रोजी करण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात दिनांक १.१.२०११ रोजी झालेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग (स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग) यांच्याकडून संस्थेला मिळालेल्या सर्व निधीचे ऑडिट करण्यात येते. सन २०१२-१३ पर्यंतचे ऑडिट पूर्ण झाले असून सन २०१३-१४ ऑडीटचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यात शिक्षण विभागाची शालार्थ ऑनलाईन संगणक प्रणाली हँग झाल्यामुळे शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(५२) * ११४२५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यात शिक्षण विभागाची शालार्थ ऑनलाईन संगणक प्रणाली गत १५ दिवसांपासून हँग झाल्यामुळे शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने संगणक प्रणालीमध्ये केलेल्या बदलामुळे वारंवार बिघाड निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. शालार्थ प्रणालीमध्ये माहिती भरताना आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे वेतन विलंबाने झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा जिल्हयातील लक्ष्मी टेकडी सदरबाझार येथून गुटखा जप्त केल्याबाबत**

**(५३) * ११३९२ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील लक्ष्मी टेकडी सदरबाझार येथून ६ लाख २० हजार २७० रुपयांचा गुटखा जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) दि. ३१/०८/२०१५ रोजी श्री. सिकंदर मलिक शेख, रा. ४९२, लक्ष्मी टेकडी, झोपडपट्टी, सदर बाझार, सातारा यांचेकडून प्रतिबंधित अन्नपदार्थ गुटखा, पानमसाला व सेंटेड तबांखू इत्यादीचा रु. ६,२१,५००/- चा साठा अन्न व औषध प्रशासनाने जप्त केला आहे. सदर प्रकरणी दि.३१/८/२०१५ रोजी F.I.R क्र. २३५/२०१५ नोंदविण्यात आला असून संबंधित व्यक्तीविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील साडेतीन हजार शाळा एक शिक्षकी असल्याबाबत**

**(५४) * ११०६५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने राज्यातील शिक्षणाच्या सद्य: स्थितीबाबत सर्वेक्षण (युडीएस) केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या युडीएस च्या अहवालानुसार १ ली ते ८ वी पर्यंतच्या सुमारे साडेतीन हजार शाळा एक शिक्षकी असून ४२ हजार ४०७ शाळा या दू शिक्षकी आहेत. तसेच ६६ हजार ९८८ शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एकीकडे जवळपास २५ हजार शिक्षक अतिरिक्त असताना विषयानुरुप या अतिरिक्त शिक्षकांचे रिक्त पदे असलेल्या शाळांमध्ये समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

युडाईज माहिती संकलनासाठी संगणक प्रणाली आहे.

(२) हे खरे नाही.

सर्व शाळांमध्ये आरटीई च्या निकषानुसार पदे मंजूर आहेत.

(३) अतिरिक्त शिक्षकांचे रिक्त पदे असलेल्या शाळांमध्ये नियमानुसार समायोजन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५५) * ११७०६ श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गाव व पांड्यामधील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी सुमारे रुपये ११० कोटी खर्च करुन जलस्वराज्य योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेचे तत्कालीन अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने जिल्ह्यातील बहुतांश योजनांची कामे झाली नाहीत व काही योजना अर्धवट राहिल्याने सुमारे ८० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे सुमारे ४ महिन्यापूर्वी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने विभागीय आयुक्तांची चौकशी समिती साधारणत: दोन महिन्यापूर्वी गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागीय आयुक्तांच्या गठीत केलेल्या समितीने कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत गाव/पाड्यांमधील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी रु. ४४.५० कोटी खर्चाची जलस्वराज्य योजना राबविण्यात आली.

(२) व (३) ठाणे व पालघर जिल्ह्यात १० वर्षात पाणी पुरवठा योजनेमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याची चौकशी गुणवत्ता नियंत्रण (Quality Control) व विभागीय आयुक्तांमार्फत करण्याचे निर्देश शासनाने दिले आहे.

(४) कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(५६) * १३८४५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ग्रामीण पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असूनही त्यापैकी बरेच पाणीपुरवठा योजना बंद असल्याने ग्रामीण भागातील नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणी पुरवठा सुरु होण्याच्या दृष्टीकोनातून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, केव्हापर्यंत निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

एकूण १३५२ योजनांपैकी सद्यस्थितीत एकूण ८ योजना या ग्रामपंचायतीने वीज बिल न भरल्याने बंद आहेत. सदर योजना बंद असल्या तरी गावात पाणी टंचाई उद्भवलेली नाही.
(२) होय,

जिल्हा परिषद स्तरावर उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी संबंधीत गावांना भेटी देवून माहिती घेण्यात आली आहे.
(३) स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती संबंधीत ग्रामपंचायत मार्फत करण्यात येत असून, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन जिल्हा परिषद मार्फत करण्यात येते. तसेच ज्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती अभावी बंद आहेत त्या जिल्हा जलव्यवस्थापन समितीच्या मान्यतेने जिल्हा परिषदेकडील देखभाल व दुरुस्ती निधीतून करण्यात येते.
(४) ग्रामपंचायतकडून अशा बंद योजनांचा प्रस्ताव प्राप्त होताच योजना दुरुस्तीची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची व सहयोगी प्राध्यापकांची आणि सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त असलेली पदे

**(५७) * १३२५३ श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चालू शैक्षणिक वर्षात १४ वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची ५२ पदे तर सहयोगी प्राध्यापकांची २०३ आणि सहाय्यक प्राध्यापकांची ४११ पदे भरण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चंद्रपूर आणि गडचिरोली तसेच बोरीवली येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरेशा सुविधा नाहीत, रुग्णांची होत असलेली गैरसोय, बहुतेक महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात निधीची गरज असताना नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे कारण काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) जागतिक आरोग्य संस्थेच्या मानकानुसार (WHO) लोकसंख्येच्या तुलनेत १:१००० याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होण्याचे उद्दीष्ट / ध्येय साधणे शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा निर्णय प्राथमिक अवस्थेत असून अंतिम करण्यात आलेला नाही.

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे सरळसेवेद्वारे व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला येथील शिवनेर हायस्कूलचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत

**(५८) * १२६०४ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला येथील शिवनेर हायस्कूलच्या प्रशासनाबाबत व शालेय कामकाजाबाबत तसेच शालेय सुविधांच्या संदर्भात अनेक तक्रारी शासनाकडे आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन शासकीय प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी शाळेची पथक तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पथक तपासणीचा अहवाल शिक्षण निरीक्षक, उत्तर विभाग यांचेकडून शिक्षण उपसंचालक, मुंबई या कार्यालयास केव्हा प्राप्त झाला आहे,

(४) पथक तपासणीच्या अहवालानुसार या शाळेच्या व्यवस्थापनाबाबत व सुविधांबाबत वस्तुस्थिती काय आहे,

(५) अहवालात आक्षेपार्ह बाबी असल्यास शासकीय प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) पथक तपासणी अहवाल शिक्षण उपसंचालक, मुंबई कार्यालयास दिनांक ०५.१०.२०१५ रोजी प्राप्त झाला आहे.

(४) व (५) सदर शाळेवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई कार्यालयाकडून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडे शिफारस केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील एस.पी.एम. इंग्रजी माध्यम, प्राथमिक शाळा, एस.पी.एम. पब्लिक शाळा आणि हुजूरपागा (मुलींची) इंग्रजी शाळेत आरक्षणानुसार प्रवेश देत नसल्याबाबत**

**(५९) * १३३२५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील एस.पी.एम. इंग्रजी माध्यम, प्राथमिक शाळा, एस.पी.एम. पब्लिक शाळा आणि लक्ष्मी रस्त्यावरील हुजूरपागा (मुलींची) इंग्रजी शाळा यांनी शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिलीच्या वर्गात २५ टक्के आरक्षणात प्रवेश दिले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शाळा व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) पहिल्याच्या वर्गात २५ % आरक्षणात प्रवेश देण्यास नकार दिल्याने शालेय मुख्याध्यापिकेंविरुध्द पोलिसात तक्रार देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (नागपूर) येथील अस्थिरोगांवर शस्त्रक्रिया करण्याबाबत**

**(६०) * १२३१० श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयात (मेडीकल कॉलेज) अस्थिरोग विभागात दोनशे पन्नासपेक्षा जास्त रूग्ण माहे मे, २०१५ पासून शस्त्रक्रियेच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रुग्णांवर त्वरीत शस्त्रक्रिया करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची भरती करण्याबाबत**

**(६१) * १२४३९ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.महादेवराव महाडिक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची भरती करण्याकरीता लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही शिक्षकांची भरती करण्यात आलेली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची भरती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयांकरिता अंशकालिन निदेशकांची भरती करण्याकरिता दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आली होती. मात्र सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्याने शासन स्तरावर फेरआढावा घेऊन कला, क्रीडा व कार्यानुभव विषय शिकविण्याकरीता अतिथी निदेशकांचे पॅनल तयार करण्याकरिता दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाद्‌वारे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

-----------------

**खाजगी वैद्‌यकीय व दंत महाविद्‌यालयात विद्‌यार्थ्यांची गुणवत्ता डावलून नियमबाहय प्रवेश दिल्याबाबत**

**(६२) * ११९९८ प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी वैद्‌यकीय व दंत महाविद्‌यालयात सन २०१२-१३ मध्ये ज्या २६ विद्‌यार्थ्यांची गुणवत्ता डावलून २०६ जागांवर नियमबाहय प्रवेश दिल्याप्रकरणी तक्रारदार उक्त विद्‌यार्थ्यांना नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी २० लाख रुपये सरकारी तिजोरीतून द्‌यावे असे मा.न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, याप्रकरणी देण्यात आलेला प्रवेश नियमांचे उल्लघंन करुन दिल्याचे प्रवेश नियंत्रण समितीने नेमलेल्या चौकशीत सिध्द झालेले असतानाही यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचा शोध अद्‌यापही न लागल्याने या प्रकरणी दोषींवर अद्‌याप कोणतीही कारवाई न झाल्याने तक्रारदार विद्‌यार्थ्यांनी न्यायालयात जाण्याचे ठरविले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

नियमबाहय प्रवेश दिल्याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणातील एकूण २२ याचिकाकर्त्या विद्‌यार्थ्यांना नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी २० लाख रुपये सरकारी तिजोरीतून द्‌यावे असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने विधीविषयक अभिप्राय प्राप्त करुन कायदेशीर बाबी तपासण्यात येत आहेत. सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खोपोली (जि.रायगड) येथील माहेश्वरी कोल डेपोने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची व पर्यावरण विभागाची परवानगी न घेता अवैधरित्या सुरु असल्याबाबत**

**(६३) * १११४४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथील माहेश्वरी कोल डेपोने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची व पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या सुरु असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित घटक व प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी यांचे संगनमताने सदर घटक अवैधरित्या सुरु असल्याने पर्यावरण विभागाच्या कायद्यांचे उल्लंघन होण्याबरोबरच स्थानिकांच्या आरोग्यास गंभीर धोका झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तक्रारीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४) सदर उद्योग विना संमतीपत्र चालू असल्याचे दिनांक २४/०७/२०१५ रोजी आढळले होते. त्याअनुषंगाने प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांनी कारणे दाखवा नोटीस एमपीसीबी/आरओआर/२०६, दिनांक २७/०७/२०१५ अन्वये बजावली होती.

त्यानंतर सदर उद्योगाने संमतीपत्रासाठी अर्ज केल्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०५/०९/२०१५ रोजी संमतीपत्र प्रदान केलेले आहे. दिनांक ०४/०९/२०१५ च्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परिपत्रकानुसार सदर उद्योग लाल संवर्गात मोडत असल्यामुळे दि. २६/११/२०१५ रोजी सदर उदयोगास लाल संवर्गात संमतीपत्र देण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉक्टरांनी लिहून दिलेल्या चिठ्ठीतील औषधे रुग्णांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६४) * ११२४० श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा अन्न व औषध प्रशासन विभागाकडून डॉक्टरांनी लिहून दिलेल्या चिठ्ठीतील प्रमाणाऐवजी आवश्यकता नसतानाही औषधांची संपूर्ण पाकीट (स्ट्रीप) घेणे बंधनकारक करण्याऐवजी रुग्णांना गरजेपुरताच गोळ्या, कॅप्सूल उपलब्ध करुन देण्याबाबत, आग्रही असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत औषध दुकानदारांच्या अडचणी लक्षात घेवून याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नियम ६५ नुसार डॉक्टरांनी लिहून दिलेल्या प्रिस्क्रिप्शनवरील वर्गीकृत औषधांची विक्री करतांना डॉक्टरांनी लिहून दिलेले प्रमाण / मात्रेनुसारच रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देणे औषध दुकानदारास बंधनकारक आहे.

उपरोक्त कायदा व त्या अंतर्गत नियम हे केंद्रशासनाने पारित केलेले असल्याने औषध दुकानदारांच्या अडचणी लक्षात घेऊन याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा तालूक्यातील आंधळगाव व नंदूर येथे नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(६५) * ११३६३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव व नंदूर या दोन नळपाणी पुरवठा योजना अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षतेमुळे अपुर्ण अवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना त्वरीत दुरुस्त करुन कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण आहे. परंतु मागणी अभावी योजना बंद आहे व नंदूर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केलेली असून काही अनुषंगिक कामे अपूर्ण आहेत.

(२) व (३) आंधळगाव व नंदूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीबाबत अनुक्रमे रु. ६४.७२ लक्ष व रु. १८.१८ लक्ष किंमतीच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. दुरुस्तीनंतर योजना कार्यान्वित करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शासनाने संचमान्यतेचे निकष बदल्याबाबत**

**(६६) * १२३४२ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने संचमान्यतेचे निकष बदल्याने एक लाख शिक्षक अतिरिक्त होणार असून मराठी व इंग्रजी शाळांना स्वतंत्र शिक्षक मिळणार नसल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अतिरिक्त शिक्षकांना नोकरी मिळावी तसेच इंग्रजी विषयाचे स्वतंत्र शिक्षक मिळावे म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. तथापि, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागातील जिल्ह्यांमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपच्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(६७) * ११६८८ श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी ज्या जिल्ह्यांत वैद्यकीय महाविद्यालय नाही, त्या जिल्ह्यांमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपच्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन ज्या जिल्ह्यांत वैद्यकीय महाविद्यालये नाहीत तेथे पीपीपी च्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** १) नाही.

२) व ३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि कोयासन विद्यापीठ यांच्यात करण्यात आलेला सामंजस्य करार**

**(६८) * ११४६७ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री जपानच्या दौऱ्यावर असताना मा.मुख्यमंत्री व वाकायामाचे गव्हर्नर योशिनोबू निसाका यांच्या उपस्थितीत दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि कोसायन विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे,

(३) उक्त कराराच्या अंमलबजावणीसाठी किती आर्थिक तरतुदींची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय,

(२) सदर सामंजस्य कराराचा उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व कोयासन विद्यापीठ वाकायामा, जपान यांच्यामध्ये शैक्षणिक आदान प्रदान व सहकार्य यांच्या कक्षा रुंदावणे असा आहे.

(३) सद्यस्थितीत सदर विषयी विद्यापीठाच्या चालु अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतुद करण्यात आलेली नाही.

-----------------

**राज्यात नैदानिक चाचण्यांचे योग्य नियोजन करण्याबाबत**

**(६९) * १११७६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८४५ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिल्याच वर्षी होणा-या नैदानिक चाचणीच्या छापील प्रश्नपत्रिका प्रत्येक शाळेत वितरीत करण्यात येत असून अनेक शाळांमध्ये पहिल्या दिवशी प्रश्नपत्रिका पोहचू शकल्या नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या नैदानिक चाचण्यांचे योग्य नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.

दिनांक १४ ते ३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत शाळांनी त्यांच्या सोयीनुसार कोणत्याही दिवशी, कोणत्याही वर्गाची भाषा अथवा गणित विषयाची चाचणी घेण्याची परवानगी शाळांना देण्यात आली होती. छपाई होईल तसतसे सुरुवातीला प्रथम भाषा व नंतर गणित विषयाच्या प्रश्नपत्रिका पुरविण्यात आल्या, पहिल्याच दिवशी दोन्ही विषयाच्या प्रश्नपत्रिका शाळांपर्यंत पोहोच करणे अपेक्षित नव्हते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता**
**पाचवी व आठवीचे वर्ग सुरु करण्याबाबत**

**(७०) * ११५८१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते चौथीच्या वर्गाला पाचवीचे तर उच्च प्राथमिकच्या सहावी ते सातवीच्या वर्गांना आठवीचे वर्ग त्वरीत जोडण्याचे निर्देश

शिक्षण संचालकांकडून राज्यभरातील शाळांना देण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील शाळा या निर्देशाकडे दुर्लक्ष करीत असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार आवश्यकता तपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १२०२७ प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा व ५७८९ उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १२५ नाटयगृहांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७१) * ११९०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२५ नाटयगृहांची दुरवस्था, उत्तम दर्जाच्या ध्वनी प्रकाश योजनेचा अभाव, प्रेक्षक आसन व्यवस्थेचा बोजवारा, समाजगृहाचे नाट्यगृहाचे झालेले रुपांतर, संदर्भात सर्वेक्षण करण्याचे आदेश मा. सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयास माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाटयगृहांचे सर्वेक्षण होऊन दीड महिना उलटून गेला तरी अद्यापपर्यंत सांस्कृतिक विभागाकडून दुरूस्ती करण्यात आली नसल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार राज्यातील नाटयगृहांचे सर्वेक्षण सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे मागील अडीच महिने (माहे जून ते माहे ऑगस्ट, २०१५) कालावधीत सर्वेक्षण समिती नियुक्त करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील नाटयगृहाच्या अहवालात केलेल्या शिफारशीनुसार शासनाने नाटयगृहांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रेक्षकांना सुसज्य नाटयगृहे केव्हापर्यंत उपलब्ध करुन देण्याचे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील नाट्यगृहांचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याचे आदेश संचालक, सांस्कृतिक कार्य यांना फेब्रुवारी, २०१५ मध्ये देण्यात आले.

(२) वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

अंतिम सर्वेक्षण अहवाल नोव्हेंबर, २०१५ मध्ये प्राप्त झाला असून या अहवालाची तपासणी, त्यानंतर सर्व संबंधितांशी चर्चा करुन राज्यातील नाट्यगृहांबाबत निश्चित कोणती योजना तयार करावी याचा आराखडा तयार करावा लागेल व त्यास शासनाची मान्यता घेतल्यानंतर अंमलबजावणीबाबत निर्णय होऊ शकेल.

(३) सर्वेक्षणाच्या कामासाठी पथक निर्माण करण्यात आले होते. समिती नियुक्ती करण्यात आली नव्हती.

(४) सर्वेक्षण अहवाल नोव्हेंबर, २०१५ मध्ये प्राप्त झाला असून त्याची तपासणी शासनस्तरावर करण्यात होत आहे. त्यानंतर उपरोक्त (२) प्रमाणे कार्यवाही होणार आहे.

(५) उपरोक्त (२) व (४) येथील कार्यवाहीनंतर उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद व प्राप्त निधीच्या आधारे याबाबतचे वेळापत्रक निश्चित होऊ शकेल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांमध्ये एकसुत्री समान शैक्षणिक धोरण अंमलात आणण्याबाबत

**(७२) * १२२३३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) राज्यात गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खाजगी अनुदानित शिक्षणाचा एक मोठा स्त्रोत कायमचा बंद होण्याच्या मार्गावर असल्याच्या पार्श्वभुमीवर राज्यात शैक्षणिक

गुणवत्ता वाढीसाठी शासनाकडून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व सरल उपक्रम राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना मोठ्या प्रमाणात मान्यता देण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांचे अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी माध्यमिक शाळांत विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात घटत असतांनाच, संच मान्यता, तुकडी निर्धारण व शिक्षक मान्यतेसंबंधीच्या शासनाच्या मागील मोठ्या कालावधीतील सततच्या अस्थिर धोरणामुळे मराठी शाळा आणि मराठी शिक्षकांच्या समस्यात वाढच होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात सध्या सर्वत्रच सरल या ऑनलाईन यंत्रणेच्या आधारे विद्यार्थ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे, मात्र त्यासाठी पुरेसे तांत्रिक पाठबळ नसल्याने सरलची वेबसाईट सातत्याने हॅंग होत असल्याच्या तक्रारी पुढे येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या तक्रारीच्या विचार करुन सरल साठीच्या सर्व्हरच्या संख्येत वाढ करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व सर्वच शाळांसाठी एकसुत्री समान शैक्षणिक धोरण अंमलात आणण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) सरल साठीच्या सर्व्हरच्या संख्येत वाढ करुन विद्यार्थ्यांची तसेच प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत पायाभूत चाचणीचे गुण भरण्यासाठी ऑफलाईन एक्सेल शीट ची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच, शिक्षकांची माहिती भरण्यासाठी जिल्हानिहाय वेळापत्रक देण्यात आलेले आहे. जादा सर्व्हर उपलब्ध करुन देण्यासाठी State Data Centre (SDC) यांना विनंती केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील खाजगी शिक्षण संस्थेत व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विदर्याथ्र्याची ई.बी.सी. वाटप करण्याबाबत**

**(७३) * ११८१४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ९३२३ ला दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शिक्षण संस्थेत व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची सन २०१४-२०१५ या वर्षाची रु. ४५० कोटी ई.बी.सी वाटप केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई.बी.सी. वाटप न झाल्याने शैक्षणिक संस्था विदयार्थ्यांकडे फी वसुलीसाठी तगादा लावत असुन मराठवाडयातील दुष्काळी परिस्थितीमुळे विदयार्थी मानसिक तणावाखाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षाची ई.बी.सी त्वरीत वाटप करणेसाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. राज्यातील खाजगी विनाअनुदानित संस्थामध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमांकरीता प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना करावयाच्या शुल्क प्रतिपूर्तीची सन २०१४-१५ करिताची रक्कम रु.३७६.२७ कोटी इतकी आहे. यापैकी रु. १८७.२७ कोटी इतकी रक्कम यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) उर्वरित रकमेची तरतूद विधीमंडळाच्या चालू अधिवेशनात करण्याचे प्रस्तावित आहे.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयात शिधापत्रिकेवर देण्यात येणा-या गहू व तांदळाच्या वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(७४) * ११५४६ श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात शिधापत्रिकेवर उपलब्ध करुन देण्यात येणा-या गहू व तांदळाच्या वाटपात दरवर्षी २० ते २५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न व औषध प्रशासनाने हिमाचल प्रदेशात कारखाना असलेल्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये अवैध औषधे (स्टिरॉईड बेस्र्ड) उत्पादकांना नोटिसा काढल्याबाबत**

**(७५) * ११९५० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषध प्रशासनाने हिमाचल प्रदेशात कारखाना असलेल्या केस, त्वचा, इत्यादि सौंदर्यप्रसाधनांमध्ये अवैध औषधे (स्टिरॉईड बेस्र्ड) उत्पादकांना माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान नोटिसा काढल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित उत्पादकांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

उत्पादक मे. टॉर्क फार्मास्युटीकल्स प्रा.लि, १३ ब १४, इआयपी, झरमाजरी, हिमाचल प्रदेश १७३२०५ यांच्या भिवंडी येथील गोडावूनला अन्न व औषध प्रशासन कार्यालयाने नोटीस दिलेल्या आहेत.
(२) होय.
(३) मे. टॉर्क फार्मास्युटीकल्स प्रा.लि, हिमाचल प्रदेश ही कंपनी "यु.बी.फेअर क्रिम, नो स्कार क्रिम व नो स्कार फेश वॉश" या त्यांच्या स्टेरॉईड युक्त ॲलोपॅथीक औषधी उत्पादनांची दैनिक "लोकसत्ता" आणि "महाराष्ट्र टाईम्स " मध्ये सौंदर्य प्रसाधने म्हणून जाहिरात करीत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

सदर कंपनी ही औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि औषधे व जादुटोणादि (आक्षेपार्ह जाहिरात) कायदा १९५४ मधील तरतुदींचे उल्लंघन करीत असल्याने अन्न व औषध प्रशासन, रायगड कार्यालयाने कंपनीस व वृत्तपत्रांना

दिनांक ११.०८.२०१५ रोजी नोटीस दिल्या आहेत. वरील तीनही औषधांचे नमुने विश्लेषण व चाचणीसाठी घेऊन उर्वरीत साठा जप्त केला आहे. सदर तीन नमुन्यांपैकी "यु.बी.फेअर क्रिम, नो स्कार क्रिम" हे दोन नमुने शासकीय विश्लेषक यांनी मिथ्याछाप घोषित केले आहेत.

सदर कंपनीचे भिवंडी येथील घाऊक औषध विक्रीचे परवाने दिनांक ०१.१०.२०१५ पासून रद्द करण्यात आले असून, सदर प्रकरणी वरील कारवाईविरुध्द उत्पादकाने मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ९१९०/२०१५ दाखल केले आहे. न्यायालयीन आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयाने सदर उत्पादकाचा साठा मुंबई येथून जप्त केला आहे व भिवंडी येथील गोडावून वर दिनांक २८/८/१५ व ३१/८/२०१५ रोजी नोटीस पाठविल्या आहेत. तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या औरंगाबाद व नाशिक कार्यालयाने उत्पादकास व जाहिरातीसंदर्भात वृत्तपत्रांना उक्त कायद्या अंतर्गत नोटीस बजाविलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग खेळाडूंना सरकारी सेवेत थेट सामावून घेण्याबाबत

**(७६) * १२०६६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनद्वारे आयोजित अधिकृत स्पर्धा तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोसिएशनद्वारे आयोजित स्पर्धा यामध्ये यश मिळविणाऱ्या अपंग खेळाडूंना सरकारी सेवेत थेट नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर नियुक्ती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील प्रशासकीय कार्यवाही क्रीडा व युवकसेवा संचालनालयाकडून स्वतंत्ररित्या प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुसरी ते आठवीपर्यंतच्या वर्गासाठी**
**मूल्यमापन चाचणी घेण्याबाबत**

**(७७) * ११२६९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुसरी ते आठवीपर्यंतच्या वर्गासाठी शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे अनिवार्य केलेली भाषा व गणिताची पायाभूत चाचणी परिक्षा ऑगस्ट महिना सुरु होऊनही घेतली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदरची परिक्षा प्रथम सत्रात ऑगस्ट अखेर तर व्दितीय सत्राच्या शेवटी संकलीत मूल्यमापन चाचणी घेण्याची निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिल्या सत्राची परिक्षा त्वरीत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, ही चाचणी १४ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत घेण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ पायाभूत चाचणी दिनांक २० ते ३१ जुलै, २०१५ अखेर व संकलित मूल्यमापन-२ ही चाचणी द्वितीय सत्राच्या शेवटी घ्यावयाची असे नियोजित आहे.
(३) संकलित मूल्यमापन-१ (पहिल्या सत्राची परीक्षा) प्रथम भाषा व गणित विषयाच्या चाचणीच्या प्रश्नपत्रिका विकसनाची प्रक्रिया सुरु आहे. सदर चाचणी ही माहे ऑक्टोबर, २०१५ ऐवजी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयास स्वतंत्र प्रशासन मंजूर करणेबाबत**

**(७८) * १२४५२ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८२६ ला दिनांक ५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळेस व महाविद्यालयास जोडून असलेल्या व स्वतंत्र असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास स्वतंत्र प्रशासन मंजूर करणेबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**नांदेड शहरात बाहेरुन येणारे विविध कंपन्याचे पॉकेटबंद दुध भेसळयुक्त असल्याबाबत**

**(७९) * ११३३७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात बाहेरुन येणारे विविध कंपन्यांचे पॉकेटबंद दुध भेसळयुक्त असल्यामुळे अनेक नागरिकांना पोटाचे विकार व किडनीचे विकार उद्भवत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, नांदेड शहरात बाहेरुन येणाऱ्या विविध कंपन्यांच्या दुधाची नियमित तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) लागु नाही.

(३) लागु नाही. तथापि, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ कायद्याअंतर्गत अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमित कारवाई करण्यात येते. दि. ५/८/२०११ पासून आजपर्यंत दूधाचे ८१ नमुने तपासणीसाठी घेतले असून, विश्लेषणाअंती ६१ नमुने प्रमाणित, ८ नमुने कमी दर्जाचे आढळून आले असून १२ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. कमी दर्जाच्या ८ प्रकरणांपैकी न्यायनिर्णयाकरीता दाखल केले असून त्यापैकी २ प्रकरणी रु. ३७,०००/- दंड ठोठावण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे शेलू (ता.कर्जत, जि.रायगड) अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील अध्यापकांना अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबाबत**

**(८०) * १३३५५ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेलू (ता.कर्जत, जि.रायगड) अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील अध्यापकांना अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने अध्यापकांनी माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात सामूहिक राजीनामा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर अध्यापकांना त्यांचे थकित वेतन देणेबाबत तसेच अध्यापकांनी राजीनामे दिले आहेत त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याप्रकरणी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्फत द्‌विसदस्यीय समिती नेमुन चौकशी करण्यात आली आहे.

शिक्षकीय कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर २०१४ ते मार्च २०१५ चे वेतन अदा करण्यात आलेले नाही. दि. २५/०८/२०१५ रोजी ३२ अध्यापकांनी एकत्रितपणे राजीनामे दिले होते, यापैकी १५ अध्यापकांचे राजीनामे व्यवस्थापनाने मंजूर करुन त्यांना कार्यमुक्त केल्याचे चौकशी दरम्यान आढळुन आले आहे. खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील अध्यापकांना वेतन देणे, त्यांना सेवेत सामावून घेणे इत्यादी बाबी संबंधित संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या अखत्यारित येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाळूज (जि.औरंगाबाद) औद्‌योगिक क्षेत्रातील केमिकल्स, सांडपाण्यामुळे जलसाठे**

**व दुषित पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम**

**(८१) * ११५५३ श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (जि.औरंगाबाद) औद्योगिक क्षेत्रातील केमिकल्स, सांडपाण्यामुळे परिसरातील सर्व जलसाठे दुषित झाले असून पाणी पिण्यायोग्य राहिले नसल्याने नागरीकांना दुषित पाणीच वापरावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील दुषित पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) वाळुंज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांच्या सांडपाण्यामुळे भूजल पाण्याची गुणवत्ता बाधित झाली असल्याची बाब खरी आहे. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सदर परिसरातील गावांना गेल्या ७ वर्षापासून जायकवाडी धरणातून पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, औरंगाबाद यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(३) होय.

(४) राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्था (निरी) व केंद्रीय भूजल संस्था यांचे मार्गदर्शनाप्रमाणे भूगर्भातील पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कृती आराखडा राबविण्यात येत असून प्रायोगिक तत्वावर सांडपाणी प्रक्रीया सयंत्रणा उभारण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयात विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा पत्रासाठी स्टँप पेपरवर छापील**

**मुल्यांपेक्षा जादा शुल्क आकारत असल्याबाबत**

**(८२) * १२५४५ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी व इतर बाबींसाठी सादर करावयाचे दाखले मिळण्यासाठी करावयाचे प्रतिज्ञा पत्रासाठी लागणारे स्टँप पेपर त्यावर असलेल्या छापील मुल्यांपेक्षा जादा शुल्क आकारण्यात येत असल्याचे दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील सर्व शाळांना ऑनलाईन संच मान्यतेबाबत**

**(८३) * १३४१२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात शैक्षणिक सत्र २०१५-१६ सुरु होऊनही अजूनही २०१४-१५ च्या संच मान्यता शाळांना प्राप्त झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षी जिल्हयातील सर्व शाळांनी ऑनलाईन संचमान्यता जिल्हा शिक्षणाधिकारी यवतमाळ यांच्याकडे पाठविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) संच मान्यता शाळांना वेळेवर प्राप्त न झाल्याने अनेक शाळांना शिक्षक वेळेवर उपलब्ध होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची कार्यवाहीत उशीर होण्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही,

(२) होय, हे खरे आहे,

(३) हे खरे नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा**

**गणवेश पुरवठ्यामध्ये केलेला गैरव्यवहार**

**(८४) * ११६४१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्याऱ्या ठेकेदाराने रुपये १ कोटी ८० लाखांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेकेदारासह संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात आली आहे.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात दोन महाविद्यालयांना एकच प्राचार्य कार्यरत असल्याबाबत**

**(८५) * ११०१६ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत एकच व्यक्ति दोन महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदावर कार्यरत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास येऊनही कोणतीही कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राचार्य सिंदेवाही, जि.चंद्रपुरच्या स्थानिक महाविद्यालयात कार्य करीत होते व स्थानिक महाविद्यालयीन प्रशासनाने त्यांना दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी निलंबित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्राचार्यांनी उच्च शिक्षण संचालक, पुणे येथे दिनांक २६ एप्रिल, २०१४ रोजी पाठविलेल्या माहितीत त्यांनी नागपूर जिल्ह्यातील मोवाड येथील समता शिक्षण महाविद्यालयाचा प्राचार्य आहे अशी माहिती सादर केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणात चुकीची माहिती सादर केल्याबद्दल दोषी प्राचार्यासह

संबंधीत महाविद्यालय प्रशासन व संस्थाचालकांवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने कोणती दंडात्मक कारवाई केलेली आहे,

(५) असल्यास, कारवाईचे स्वरुप व रुपरेषा काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्राचार्यांना दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी निलंबित करण्यात आले होते.

(३) होय.

(४) व (५) सदर प्रकरणी चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावार डॉ. रमेश ढोरे यांनी सादर केलेले स्पष्टीकरण व सिंदेवाही महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने विद्यापीठाचे स्थायी अधिवक्ता यांनी दिलेला अभिप्राय यांचा सारासार विचार करुन डॉ. रमेश ढोरे यांची समता शिक्षण महाविद्यालय, मोवाडे या कायम विनाअनुदानित महाविद्यालयात दिलेली प्राचार्य पदाची मान्यता रद्द करण्यात आली आहे. तसेच सदर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाला विद्यापीठाने कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न, औषध प्रशासन यांच्या कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कारवाई करण्याबाबत**

**(८६) * ११८७४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न, औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांच्या कार्यालयातील प्रत्यक्ष तीन कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कारवाईसाठी जबाबदार असताना सदर कार्यालयातील एकाच कर्मचाऱ्यास माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निलंबित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेत समाविष्ट असलेल्या तीनही कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अन्न सुरक्षा

अधिकारी संवर्गातील एका अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकडल्याने, त्या अधिकाऱ्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या कलम ७,१३ (१)(ड) सह १३(२) अन्वये, दि.१०.०३.२०१४ रोजी गुन्हा दाखल करुन, सदर अधिकाऱ्यास दि. ११.०३.२०१४ रोजी अटक केल्याने, त्यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दि. २७.०२.२०१५ रोजी विशेष खटला क्र. २५/२०१५ अन्वये अभियोग दाखल करण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त, प्रशासनातील अन्य दोन अधिकाऱ्यांच्या या गुन्हयातील सहभागाबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने केलेल्या तपासामध्ये, एका अधिकाऱ्याचा सदर गुन्हयात सहभाग नसल्याचे कळविले आहे व अन्य अधिकाऱ्याच्या सहभागाबाबत त्या विभागाकडून अधिक तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बी.एड आणि डी.एड अभ्यासक्रमात शिक्षणभरती बंद करण्यात आल्याबाबत**

**(८७) * १२०३४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बी.एड आणि डी.एड अभ्यासक्रमात शिक्षणभरती बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त शिक्षकांची भरती बंद केल्यास दुष्काळग्रस्त भागातील शिक्षकांसह शहरातील शिक्षकांवर उपसमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने शैक्षणिक धोरणाचा विचार करुन शिक्षणभरतीबाबत निर्णय घेऊन शिक्षकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, नवी दिल्ली यांच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ च्या अधिसूचनेन्वये निर्धारित करण्यात आलेल्या शिक्षकीय पदांच्या आकृतिबंधानुसार राज्यातील बी.एड महाविद्यालयांमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन होईपर्यंत पदे भरण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये, असे आदेश संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण यांना

दिलेले होते.

तथापि, राज्यातील डी.एड कॉलेजवरील शिक्षक भरतीस शासनस्तरावरुन कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चेंबूर (मुंबई) येथे तांदूळ व गव्हाचा अवैध साठा जप्त केल्याबाबत**

**(८८) * ११३२४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकाशदिप बिल्डिंग, पेस्तम सागर रोड नं. ३ ,चेंबूर, मुंबई येथील इमारतीतील एका गाळ्यावर टाकलेल्या धाडीत तांदूळ व गव्हाचा काळ्या बाजारात नेण्यात येणारा रुपये ८ लाख ७१ हजार ५०० किंमतीचा अवैध साठा अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या नियंत्रक, शिधा वाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालयाने जप्त केल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) अन्न सुरक्षा योजनेचा तांदुळ व गहू अवैधरित्या साठवणूक करुन काळ्याबाजारात विक्रीस पाठविला जात असताना सदरचा साठा जप्त करण्यात आला असून, संबधितां विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत तरतुदी नुसार गु.नो.क्र.१८८/२०१५ दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी टिळकनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

-----------------

**म्हसळा (जि.रायगड) शहरातून वाहणाऱ्या जानसई नदीत शहरातील चिकन विक्रेते कोबड्यांचे अवशेष व पिसे थेट नदीत टाकत असल्याबाबत**

**(८९) * १३४०७ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) शहरातून वाहणाऱ्या जानसई नदीत शहरातील चिकन विक्रेते कोबड्यांचे अवशेष व पिसे थेट नदीत टाकत असल्याने नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होऊन शहरात काविळ, टायफाईड, उलटी-जुलाब या रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरली असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, जानसई नदी कायमस्वरुपी प्रदूषणमुक्त करण्याचेदृष्टीने चिकन विक्रेत्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही .

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदरात कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत असल्याबाबत**

**(९०) * १३७०८ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदरात कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत असल्याने तेथील परिसरात मोठया प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रासायनिक सांडपाण्यामुळे तेथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात येवून नौकांचे इंजिनही नादुरुस्त होत असल्याने मच्छिमारांचे मोठे नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, रासायनिक सांडपाणी सोडणा-या कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) मिरकरवाडा बंदरात कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत नसल्याने हे खरे नाही. तथापि, मिरकरवाडा बंदर हे मच्छिमारी बंदर असून बंदर परिसरात मासे सुकविण्यात येत असल्याने काही प्रमाणात दुर्गंधी जाणवते.
(२) रासायनिक सांडपाण्यामुळे तेथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले नसल्याचे रत्नागिरी नगरपरिषद, रत्नागिरी यांनी त्यांचे पत्रात नमुद केले असून नौकांचे इंजिन बंद पडल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे मत्स्यव्यवसाय अधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाली (ता.जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानात झालेला गैरव्यवहार**

**(९१) * १४०५५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानात ७३० पैकी ५१७ शिधापत्रिका बनावट असल्याची तक्रार ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्न नागरी पुरवठा अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार गावात ३ रेशन दुकाने असून १९९७ व ९८ च्या गणनेप्रमाणे २८७ कुटूंब दारिद्ररेषेखालील असून ४४३ शिधापत्रिका दुकानदारांनी प्रशासनाला हाताशी धरुन ७३० कुटूंब दारिद्र रेषेखाली असल्याचे बनावट शिधापत्रिका बनवल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खांडेकर वस्तीमधील २४ कपीलधारवाडी ५०, अशा एकूण ५१७ बनावट शिधापत्रिका आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) दुकानदाराकडे आलेल्या व कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या शिधापत्रिकांचा अभ्यास केल्यानंतर या तीन दुकानात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या तीन दुकानांच्या मालकावर व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे काय,
(६) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड व अन्य ठिकाणी सदरची तक्रार दाखल केली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याबाबत**

**(९२) * ११३९३ श्री.जर्नादन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची गळतीसंदर्भात शिक्षण विभागाने नुकत्याच घेतलेल्या आढाव्यात विद्यार्थ्यांचा सरकारी शाळांकडून खाजगी शाळांकडे वाढत असलेला कल, शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याने प्राथमिक शाळांमधील ७५ हजार शिक्षक अतिरिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शाळेची गुणवत्ता वाढविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची सन २०१५-१६ पासून अंमलबजावणी सुरु केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा नागपूर येथील**
**शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(९३) * ११०५१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलींना सैनिकी प्रशिक्षण देणारी राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, नागपूर या शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन माहे मे, २०१४ पासून आजपावेतो प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत कार्यरत शिक्षकांपैकी अनेक शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता २०१२ पासून देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भौतिक सुविधांचा अभाव असून त्याची पूर्तता न केल्यामुळे शिक्षण विभागाने सदरहू शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक, पुणे यांचेकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या शाळेतील शिक्षकांच्या वेतनाचा व समायोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शिक्षकांच्या वेतनाचा व समायोजनाचा प्रश्न निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) नाही, शैक्षणिक सत्र २०१४-१५ करीता शाळेची मान्यता एक वर्षासाठी सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली असून त्याअनुषंगाने शिक्षकांना सन २०१४-१५ या सत्राचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. सन २०१३-१४ या वर्षाच्या संच मान्यतेमध्ये शिक्षक अतिरिक्त ठरत नसल्याने समायोजनाचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धनगर मोहा (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानदाराने धान्य काळ्या बाजारात विकल्याबाबत

**(९४) * ११७०७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धनगर मोहा (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. गिरी यांनी शिधावाटप पत्रिकाधारकांना पुरवठा विभागाने वितरीत करण्यासाठी दिलेले धान्य काळ्या बाजारात विकल्याबाबत भिमराव खांडेकर व दत्ताराव हाके यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार तहसिलदार, गंगाखेड यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तहसिलदार गंगाखेड यांनी चौकशी केली असता लाभार्थींनी धान्य मिळाले नसल्याबाबत तहसिलदार गंगाखेड यांजकडे समक्ष कार्ड धारकांनी माहिती दिली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वस्त धान्य दुकानदार श्री. गिरी यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

मौ.धनगर मोहा ता. गंगाखेड जि. परभणी येथील शिधापत्रिकाधारकांनी दि.२७/८/२०१५ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, गंगाखेड यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असता, श्रीमती गिरी. यांच्या स्वस्त धान्य दुकानात अनियमितता आढळून आल्याने, त्यांना दोषी ठरवून जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी श्रीमती गिरी यांचा स्वस्त धान्य दुकानाचा परवाना दिनांक १२/१०/२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणामुळे त्वचा व श्वसनाच्या आजाराचे रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(९५) * १३८४९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा प्रदुषणाच्या बाबतीत ४ थ्या क्रमांकावर असल्यामुळे त्वचा आजाराने १७ हजार रुग्ण तसेच श्वसनाच्या आजाराचे ८८ हजार ५६३ रुग्ण आढळून आल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ५ वर्षात प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारातून जिल्हयात ३४३ नागरीकांचा मृत्यू झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदूषणावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासनाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नीरी, नागपूर व आय.आय.टी. मुंबई यांच्याकडून चंद्रपूर शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करुन घेतला आहे. सदर कृती आराखडयानुसार हवा, जल व जमीन प्रदूषण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कराड (जि.सातारा) तालुक्यात शालेय पोषण आहारात शरीराला घातक असे घटक आढळून आल्याबाबत**

**(९६) * १३२६६ श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यात पाठविण्यात आलेल्या शालेय पोषण आहाराचा तपासणी केली असता सदर पदार्थामध्ये शरीराला घातक असे घटक आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शालेय पोषण आहार घातक स्वरुपाचा पाठविणाऱ्या पुरवठादारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९७) * १२६०६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे विभाजन सुमारे १ वर्षापूर्वी होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नवीन पालघर जिल्हयासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे काय व असल्यास केव्हा,

(३) असल्यास २०१५-१६ च्या पालघर जिल्हयाच्या जिल्हा क्रीडा स्पर्धा पालघर जिल्हा स्तरावर सुरु झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पालघर जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या क्रीडा विषयाकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) तथापि, पालघर जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या क्रीडा विषयाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही. पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत असून सद्य:स्थितीत ठाणे जिल्हयामार्फत पालघर जिल्हयातील तालुक्यांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेनंतर आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पालघर जिल्हयातील खेळाडू विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

-----------------

**नागपूर जिल्हयातील गावांमध्ये पाण्याचे नमुने दुषित आढळल्याबाबत**

**(९८) * १२३१९ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा,घोघरा,काटाले तालुक्यात कलंभा व कळमेश्र्वर तालुक्यातील आदासा ग्रामपंचायतीमध्ये पाण्याचे नमुने दुषित आढळले असून त्याना तीव्र दुखणीचे घोषित करुन लाल कार्ड देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुषित पाण्यामुळे तेथील नागरीकांना काविळ व अतिसार या रोगाची लागण झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुषंगाने ग्रामपंचायतीमध्ये नागरीकांना स्वच्छ पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तालुका नरखेड येथील लोहारी, सावंगा गावांमध्ये दिनांक ६/०२/२०१५ रोजी ३९ लोकांना काविळची लागण झाली होती. घोघरा, काटोल तालुक्यातील कलंभा व कळमेश्वर तालुक्यातील आदासा येथे कोणत्याही प्रकारची लागण झालेली नाही.

(३), (४) व (५) सर्व पाणी स्त्रोतांचे शुध्दीकरण करण्यात आले, पाईप लाईन लिकेज, व्हॉल गळती या त्रुटीची पूर्तता करुन नियमित पिण्याच्या पाण्याचे ब्लिचिंग पावडर टाकून निर्जंतुकीकरण करुन नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा सुरु केला आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाद्वारे नियमित सर्वेक्षण करुन आढळून आलेल्या रुग्णांवर त्वरित उपचार करुन साथ रोगावर नियंत्रण करण्यात आले.

-----------------

**राज्यात शिक्षक आणि शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार एक तारखेला करण्याबाबत**

**(९९) * १२४१४ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सतिश चव्हाण, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक आणि शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक महिन्याच्या एक तारखेलाच वेतन अदा केले जावे, असा आदेश शिक्षक विभागाने दिला असून या आदेशाच्या लाभापासून अनेक कर्मचारी वंचित असून त्यांना १५ तारीख उलटून गेल्यावरही पगार मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणामुळे अनेक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गृह कर्जाचे हप्ते, एलआयसीचे हप्ते वेळेत न भरल्यामुळे त्यांना व्याजाचाही भुर्दंड भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

(३) शासन परिपत्रक दिनांक १३.८.२०१५ अन्वये शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात बदली कामगारांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत**

**(१००) * १११७० श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात ३२ वर्षापासून बदली कामगार म्हणून कार्यरत असणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील बदली कामगारांना अद्याप शासन निर्णयानुसार कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बदली कामगारांना मा. न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत महाराष्ट्र वैद्यकिय शिक्षण विभागातील बदली कर्मचारी संघटनेच्यावतीने वेळोवेळी आंदोलने केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रोजंदारी कामगारांना कायम करण्यासाठी २४० दिवसांची सेवा अट रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, वैद्यकिय शिक्षण यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अट रद्द करुन या कामगारांना कायम करणेबाबत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने व इतर अनेक विभागाने कंत्राटी कामगारांसाठी कायमस्वरूपी अस्थायी आस्थापना निर्माण केली आहे, त्या धर्तीवर वैद्यकिय शिक्षण विभाग निर्णय घेणार आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथील २९९ बदली कर्मचाऱ्यांची २४० दिवसांची सेवा पूर्ण करण्याची अट शिथील करुन प्रस्तावात समावेश करण्यात आला होता परंतु त्यास मान्यता मिळालेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

दि. १६.३.२०१५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि. सोलापूर) तालुक्यातील करंब गावात नविन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१०१) * ११३६५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि. सोलापूर) तालुक्यातील करंब गावामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून पाण्यासाठी ग्रामस्थांना भटकंती करावी लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करंब गावाच्या १४ कोटीच्या नविन पाणीपुरवठा योजनेचे काम अपुर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने सदरील पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने पूर्णत्वास नेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. परंतु सदर गाव हे करंब नसून करकंब आहे व त्या गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न टँकर लावून सोडविलेला आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे. करकंब नळ पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगती पथावर असून ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे. अस्तित्वातील उपांगाचा वापर करुन योजनेचे काम मार्च २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील साडेतीन हजार वयोवृध्द कलावंताना मानधन मिळण्याबाबत**

**(१०२) * १२३४३ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनंत गाडगीळ, श्री.आनंद ठाकूर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृध्दापकाळात लोककलावंत आणि साहित्यिकांना सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून अ,ब,क या वर्गवारीनुसार अनुक्रमे रुपये २१००/-, १८००/- आणि १५००/- असे मानधन प्रतिमहा दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मानधन हे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा परिषद स्तरावर वयोवृध्द कलावंत मानधन समितीला असूनही साडेतीन हजार वृध्द कलावंत सन २००९ पासून मानधनापासून वंचित असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सन २००९ पासून वंचित असलेल्या साडेतीन हजार वृध्द कलावंताचे मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) नव्याने पात्र ठरलेल्या कलावंतांना मानधन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध झाला नव्हता. पुरवणी मागणीमध्ये सदरील निधीची मागणी केली असून निधी उपलब्ध होताच नव्याने पात्र ठरलेल्या कलावंतांसाठी आवश्यक असलेला निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

## ११ वीच्या प्रवेश प्रक्रियेत अनुदानित दीडशेहून अधिक महाविद्यालयांमध्ये साडेपाच हजार जागा रिक्त असल्याबाबत

**(१०३) * ११६७२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खासगी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांवर शिक्षण विभाग दरवर्षी कोटयवधी रुपये खर्च करीत असूनही नाममात्र प्रवेश शुल्क आकारणा-या या महाविद्यालयांकडे विद्यार्थी पाठ फिरवीत असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११ वीच्या प्रवेश प्रक्रियेत अनुदानित दीडशेहून अधिक महाविद्यालयांमध्ये साडेपाच हजार जागा रिक्त असून १०० हून अधिक जागा रिक्त असणा-या महाविद्यालयांची संख्या १० इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनुदानित महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना सदरील महाविद्यालयात प्रवेश घेण्यास प्रोत्साहन करण्यासाठी शासनाने योजना तयार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदा शाळांमध्ये अग्निशमन यंत्र बसविण्यासाठी करावयाची कार्यवाही

**(१०४) * ११४६९ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अग्निशमन यंत्र बसविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता सुमारे १९१ कोटी रुपयांची अग्निशमन यंत्रे खरेदीचा प्रस्ताव तयार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी गेला असता वित्त विभागाने या नियमबाहय प्रस्तावास तीव्र स्वरुपाचा आक्षेप घेऊन प्रस्ताव अमान्य करुन चुकीच्या पध्दतीने खरेदी होत असल्यामुळे या सगळ्या प्रकरणाची चौकशी करावी अशी शिफारस वित्त विभागाने माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त विभागाने चौकशी संदर्भात कोणत्या मुद्यानुसार चौकशी करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) वित्त विभागाने चौकशी करण्याबाबत निदेश दिलेले नाहीत. या प्रकरणी शालेय शिक्षण विभागाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. चौकशी अहवाल अद्याप प्रलंबीत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत शिक्षकांचे वेतन अनियमित होत असल्याबाबत**

**(१०५) * १३०७० श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत शिक्षकांचे वेतन मागील सहा महिन्यापासून अनियमित होत असून एक ते दोन महिने उशिरा होत असलेल्या वेतनांमुळे तसेच प्रशासनाच्या वेळकाढू धोरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे, शालार्थ प्रणालीमधील तांत्रिक अडचणींमुळे वेतन अदा करण्यास विलंब झाला आहे.

(३) व (४) शालार्थ प्रणालीमधील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी पाऊले उचलली गेली आहेत.

-----------------

**शालेय पोषण आहारांतर्गत शाळांना पुरविण्यात येत असलेल्या अन्नधान्याबाबत**

**(१०६) * ११५८२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहारातंर्गत शाळांना पुरविण्यात येत असलेल्या अन्नधान्य दर्जाबाबत तक्रारी येत असल्यामुळे त्रयस्थ संस्थेमार्फत राबविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेत विद्याथ्याची गळती थांबविण्यासाठी केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार सुरु करण्यात आला असून केंद्र व राज्य शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबविली जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्नधान्याचा मालाच्या दर्जाबाबत संभ्रम निर्माण झाला असल्याने मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) शालेय पोषण आहार हि केंद्र पुरस्कृत योजना असून शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित / अंशत: अनुदानित शाळा, बालकामगार प्रकल्प इ. मधील इ. १ ली ते ८ वी मध्ये शिकणारे विद्यार्थी योजनेचे लाभार्थी आहेत.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरवठा करण्यात येत असलेल्या धान्यादी मालाच्या दर्जाबाबत काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर बाब विचारात घेऊन या योजनेंतर्गत धान्यादी मालाच्या पुरवठ्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या निर्णयानुसार योजनेंतर्गत चांगल्या प्रतीच्या धान्याचा पुरवठा होण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याबाबत

**(१०७) * ११८९३ अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ मध्ये कायम हा शब्द वगळून शासनाने सन २०१२-१३ पासून टप्पाटप्प्याने विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून सन २०१२-१३ मध्ये अनुदान मिळण्यासाठी शासनातर्फे शाळाचे ऑनलाईन मुल्यांकन करण्यात आले होते व त्यामध्ये पात्र शाळांना सन २०१३-१४ पासून अनुदान देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाचा निर्णय होऊनही गेल्या तीन वर्षापासून, राज्यातील विनाअनुदानीत शाळांना अद्यापही अनुदान वितरित करण्यात आले नसल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समिती संघटनेच्यावतीने शासनास आजतागायत अनेकदा निवेदने देऊनही कार्यवाही होत नसल्यामुळे दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ पासून “जेल भरो आंदोलन” व “आत्मक्लेश आंदोलन” करण्याचा सदर संघटनेच्यावतीने शासनास इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय. शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००९ नुसार निधीच्या उपलब्धतेनुसार शाळांना वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. विहित निकषानुसार अनुदान पात्र शाळांना वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांकडून होणारी वसूली**

**(१०८) * १३१८७ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांकडून वसुलीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये जमविणाऱ्या वेतन अधीक्षक कार्यालयाकडून ही रक्कम देण्यास विलंब होत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुषंगाने या वसुलीची रक्कम सदर शिक्षकांना परत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक २५ जून, २०१३ पर्यंत अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना दिनांक १८ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये जानेवारी, २०१४ पासून प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तथापि, या अनुदान पात्र घोषित केलेल्या शाळांना त्यांच्या टप्प्यानुसार वेतन अनुदान हे जानेवारी, २०१४ पूर्वीच अनावधानाने अदा करण्यात आले होते. सदर वेतन अनुदान वसूल करण्यात आले आहे. यासंदर्भात झालेल्या अनियमिततेबद्दल चौकशी करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१०९) * १२४५३ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ८०६६ ला दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उमरी (जि.नांदेड) शहरात गोवा, सितार, आदत तंबाखूजन्य गुटख्याची विक्री होत असल्याबाबत**

**(११०) * ११३४८ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी शहरात (जि.नांदेड) येथे गेल्या अनेक दिवसांपासून गोवा, सितार, आदत इ.प्रकार वा तंबाखूजन्य गुटखा, हॉटेल्स इ. ठिकाणी उघडपणे विक्री होत आहे तसेच शहरात ठोक स्वरुपात गुटखा विक्री होत असून इतर शहरांत वाहनाद्वारे पाठविला जात असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गुटखा विक्रीला बंद असतानाही येथे सर्रासपणे गुटखाविक्री होत असल्याने या गुटखा विक्रीला पायबंद घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणा-या नियमित कारवाईच्या दरम्यान दि. ११ सप्टेंबर, २०१५ रोजी सितार माव्याची चोरटी वाहतूक करताना एका इसमास उमरी, नांदेड येथून पकडण्यात आले.

(२) गुटखा विक्रीवर प्रतिबंध असतानाही अवैध विक्री करणा-यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून नजर ठेवून कारवाई करण्यात येते. नांदेड जिल्हयात सन २०१४-१५ व एप्रिल, २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत एकूण ९७ प्रकरणी कारवाई करण्यात आली असून, रु. ३ कोटी ६३ लाख किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. सर्व प्रकरणी FIR दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपळनेर (ता.बीड) येथील शासकीय गोदामात झालेला धान्याचा गैरव्यवहार**

**(१११) * ११५५० श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर (ता.बीड) येथील शासकीय गोदामातील स्वस्त धान्य योजनेची जबाबदारी असणा-या गोदामपाल यांनी धान्याचा काळा बाजार करुन गैरव्यवहार केल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गावक-यांनी निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुषंगाने गैरव्यवहार करणा-या गोदामपाल यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच गोरगरीब जनतेला स्वस्त धान्याचा लाभ मिळण्याबाबत पारदर्शक गोदामपालाची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) शासकीय गोदाम पिंपळनेरच्या परिसरात १ ट्रक धान्यासह व दुसऱ्या ट्रकमध्ये धान्य भरण्याच्या तयारीत असताना दि.१९.०९.२०१५ रोजी नागरिकांना आढळून आल्यानंतर पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गु.र.नं.२६/२०१५ अन्वये जीवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७ अन्वये दि.१९.०९.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी श्री.अतुल झेंड, गोदाम रक्षक पिंपळनेर यांना दि. १९.०९.२०१५ रोजीच्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

-----------------

## गोंदिया शहरासाठी पाणीपुरवठा योजनेव्दारे पाठविण्यात येणा-या पाण्याचे मिटरचे बिल रिडिंग न करता ग्राहकांना पाठविले जात असल्याबाबत

**(११२) * १२५५१ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्यावतीने गोंदिया शहरासाठी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे पाण्याचे मिटरचे बिल रिडिंग न करता मोघमपणे ग्राहकांना पाठविले जात असल्याच्या तक्रारी अनेक ग्राहकांकडून केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुषंगाने ग्राहकांना पाण्याच्या मिटरचे रिडिंग घेऊन योग्य पाणी बील देण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय,

(२) व (३) गोंदिया शहरामध्ये नवीन व जुन्या पाईपलाईनवर एकूण ११४९१ नळजोडण्या अस्तित्वात असून त्यापैकी १६०२ मीटर सद्य:स्थितीत बंद आहेत. ज्या ग्राहकांचे मिटर सुस्थितीत आहेत अशा ग्राहकांना पाण्याचे मिटरचे बिल रिडिंग करुनच देण्यात येतात. व ज्या ग्राहकांचे मिटर नादुरुस्त आहेत अशा ग्राहकांना दोन देयके त्यांनी केलेल्या पूर्वीच्या वापरानुसार सरासरी अथवा कमीत कमी दराने देयके देण्यात येतात. ज्या ग्राहकांचे मीटर नादुरुस्त आहे त्यांना सदर नादुरुस्त मीटर त्वरीत बदलण्याबाबत कळविण्यात येते. नादुरुस्त मीटर बदलणे ही ग्राहकाची जबाबदारी आहे. त्यानंतर देखील संबंधित ग्राहकाने नादुरुस्त मिटर न बदलल्यास समपातळी दराने आकारणी करण्यात येते.

(४) ज्या ग्राहकांचे मीटर सुस्थितीत आहेत अशा ग्राहकांना पाण्याचे मीटर बील रिडिंग करुनच देण्यात येते. नादुरुस्त मीटर असलेल्या ग्राहकांना दोन देयके त्यांनी केलेल्या पूर्वीच्या वापरानुसार सरासरी अथवा कमीत कमी दराने देयके देण्यात येतात व त्यानंतरची देयके समपातळी दराने आकारणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळालगत ग्रीड बनविणा-या कारखान्यावर प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्याने टाकलेला छापा**

**(११३) * १३०४७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली, (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळालगत असलेल्या उसरघर, संदप, बदलापूर पाईप लाईन या परिसरात चार्जिगच्या बॅटरीसाठी लागणारे ग्रीड बनविले जात असून कोळशावर चालणार ग्रीड बनविले जात असून कोळशावर चालणाऱ्या भट्टीवर हे उत्पादन घेतले जात असून यामुळे मोठ्या प्रमाणात आजूबाजूच्या परिसरात धूर निर्माण होत असल्याने नागरिकांना या प्रदूषणाचा त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रदूषण मंडळाच्या अधिकारी या ग्रामीण भागात आठवड्यापूर्वी छापा टाकून संबंधित उद्योजकांवर परवाना मागितला असता त्यांच्याकडे कोणतीही आवश्यक कागदपत्रे नसल्याचे उघड झाले, परंतु या धाडीच्या वेळी पोलीस संरक्षण नसल्याने सदरहू उद्योजकांनी अधिकाऱ्यांवर हल्ला करत त्यांनी बनविलेला अहवाल फाडून टाकला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) व (३) प्रश्नाधीन घटनेच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना अवैध उदयोगांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शालेय विद्यार्थ्यांच्या बुध्दिमता मापन करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या 'शिष्यवृत्ती परीक्षाची' पुनर्रचना करण्याबाबत**

**(११४) * ११८७९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय विद्यार्थ्यांच्या बुध्दिमता मापन करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या 'शिष्यवृत्ती परीक्षा' ची पुनर्रचना करण्याचा शासनाचा विचार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीक्षेतील विषय कमी करुन मोठया प्रमाणावर बदल करावा अशी मागणी पालकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाने बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ पारित केला असून राज्यात या कायद्याची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०१० पासून सुरु झालेली आहे. या कायद्यान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक शिक्षण म्हणून विहित केलेले आहे. या कायद्यातील तरतूदी विचारात घेवून दि. २९ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात कार्यान्वित असलेला पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर आता इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी आणि इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये करण्यात आला आहे. तसेच दिनांक १० नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत परिक्षेचा अभ्यासक्रम निश्चित करण्याकरिता समिती गठीत करण्यात आली असून प्रस्तूत प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अंधेरी येथे विषारी वायुमुळे झालेली बाधा**

**(११५) * १२०३५ श्री.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विदया चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी परिसरात एका प्लाईट किचनमधील गॅस किटची गळती होऊन त्यातून बाहेर आलेल्या विषारी वायुमुळे २४ जणांना दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी बाधा झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील शालेय शिक्षण विभागातील आधीचे शिक्षण उपसंचालक आणि तात्पुरता कारभार वाहणारे उपसंचालक यांच्यावर निलंबनाची कारवाई केल्याबाबत**

**(११६) * १३१८१ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शालेय शिक्षण विभागातील आधीचे शिक्षण उपसंचालक एन.बी.चव्हाण आणि तात्पुरता कारभार वाहणारे उपसंचालक श्री.फडतरे यांना अकरावी ऑफलाईन प्रवेश राबविताना झालेले गोंधळ आणि शिक्षकांच्या मान्यतेबाबतच्या प्रकरणी दोषी ठरवून निलंबनाची कारवाई केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या उच्च अधिकाऱ्यांवर निलंबनाच्या कारवाई मुळे अधिकारी-कर्मचारी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ बाबत शालेय विभागातील उपसंचालकांवर केलेल्या निलंबनाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे, श्री.एन.बी.चव्हाण, तत्कालिन विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी मुंबई येथील विविध पदांवर कार्यरत असतांना केलेल्या अनियमितते प्रकरणी निलंबीत करण्यात आले होते. तसेच श्री.फडतरे निलंबीत विभागीय उपसंचालक, मुंबई यांनी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत तसेच त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, अहमदनगर येथे कार्यरत असताना केलेल्या अनियमितेबाबत त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

(२) नाही,

(३) व (४) संबंधित्यांनी केलेल्या अनियमिततेबाबत विभागीय चौकशीचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडून मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**किकवी (ता.कर्जत, जि.रायगड) वराह पालन व्यवसाय करणारा फार्म हाऊसमुळे डुक्करांचे मलमुत्र आणि विष्ठा नाल्यातून चिल्लार नदीत सोडल्याने नदीचे पाणी दूषित होत असल्याबाबत**

**(११७) * १३४५१ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किकवी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे गेली ४ वर्षे वराह पालन फार्म हाऊसमुळे डुक्करांचे मलमुत्र आणि विष्ठा नाल्यातून चिल्लार नदीत सोडल्याने त्या दुर्गंधीमुळे नदीचे पाणी दूषित झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिल्लार नदी दूषित होवू लागल्याने या नदीच्या तीरावर अनेक नळपाणी योजनांचे पाणी दूषित झाल्यामुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील फार्महाऊस स्थलांतरीत करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही .

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोटे (जि.रत्नागिरी, ता.खेड) येथील कारखान्यातील दुषित पाणी वाशिष्टी नदीत व दाभोळ खाडीत सोडण्यात येत असल्याबाबत**

**(११८) * १३७१३ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (जि.रत्नागिरी, ता.खेड) येथील कारखान्यातील दुषित पाणी गेली कित्येक वर्षे वाशिष्टी नदीत व दाभोळ खाडीत सोडण्यात येत असल्यामुळे तेथील मासे मृत्यूचे प्रमाण वाढले असून मासेमारीवर उपजिवीका करणाऱ्या बांधवांवर उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित पाणी शुध्द करण्यासाठी तेथे उभारलेले CETP आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी शासनाने रुपये २६.५४ कोटी निधी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधुनिकीकरण व विस्तारीकरणाच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उपरोक्त प्रकरणी पाहणी करुन प्रदूषण करणाऱ्या कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर काम केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) मत्स्यव्यवसाय अधिकारी, रत्नागिरी यांचे अहवालानुसार माश्यांच्या उत्पादनात ७४.५ टक्के इतकी घट आली असल्याचे नमुद केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम समिती कडून पर्यावरण विषयक ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.